जागा विकणे आहे

अलिबाग वरसोली
येथे लगतचे ४८००स्के. फुटांचे लेआऊटमधील 2 NA Plots विकणे आहे. अपेक्षित किंमत. ६० लाख प्रत्येकी (१२०० प्रती स्के.फुट) बंगला हॉटेल, लॉज अथवा बिल्डरसाठी जागा विकणे आहे.

राज : ९८२२२५७९२९/ ९०६७१०५९९१

कृषीवल

रायगड ॥ रविवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२२

किंमत ४ ₹

जागा विकणे आहे

अलिबाग किहीम येथे लगतचे ४००० स्के. फुटांचे लेआऊट मधील 2 NA Plots विकणे आहे. अपेक्षित किंमत १ कोटी २० लाख प्रत्येकी. (३००० प्रती स्के. फुट) बंगला, हॉटेल, लॉज अथवा बिल्डरसाठी जागा विकणे आहे.

राज : ९८२२२५७९२९/९०६७१०५९९१

महत्त्वाचे

मुख्यमंत्री शिंदे आज रेवदंड्यात

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवारी (दि. २३ ऑक्टोबर) रेवदंडा येथे येणार आहेत. यावेळी ते ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेणार आहेत. सकाळी दहा वाजता त्यांचे रेमंड हेलिपॅड, ठाणे येथून रेवदंड्याकडे प्रयाण होणार आहे. साळावच्या जेएसडब्ल्यू हेलिपॅडवर त्यांचे आगमन होईल. त्यानंतर ते सकाळी ११.१५ ते २.३० या कालावधीत निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांची सदिच्छा भेट घेणार आहे.

उद्धव ठाकरे आज मराठवाडा दौऱ्यावर

। मुंबई । प्रतिनिधी ।

मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने शेतीचे नुकसान झालेले आहे. याची पाहणी करण्यासाठी उद्धव ठाकरे रविवारी (२३ ऑक्टोबर) मराठवाडा दौऱ्यावर जात आहेत. मागील आठवड्याभरापासून मराठवाड्यामध्ये झालेल्या पावसाने कापूस आणि सोयाबीनचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. परंतु, शेतकऱ्यांना ठोस मदत झाली नाही.

अलिबाग-वडखळच्या दुपदरीकरणाला मंजुरी

आ. जयंत पाटील यांच्या मागणीला नितीन गडकरी यांचा हिरवा कंदील

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

आमदार जयंत पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग जहाज वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या अलिबाग ते वडखळ हा रस्ता दुपदरी करण्याच्या मागणीला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे आता अलिबाग ते वडखळ मार्गावरील प्रवास सुखकर होणार आहे.

अलिबाग ते वडखळ (घा 0.00 ते घा.२२.२००) या २२.२ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम वार्षिक आराखडा २०२२-२३ अंतर्गत पेवड शोल्डरसह दुपदरी करण्याचे काम (काँक्रिट) मंजूर करण्यात आले असल्याचे पत्र कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, रत्नागिरी यांना या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाच्या मुख्य अभियंता यांनी दिले आहेत. या रस्त्याचे काम काँक्रिटीकरणातून करण्यात येणार आहे. त्यामुळे आता या कामाला लवकरच गती मिळणार आहे.

(७ जून २०२२)

प्रवास होणार जलद व सुखकर

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग जहाज वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची ७ जून २०२२ रोजी आ. जयंत पाटील यांनी दिल्ली येथे भेट घेत याबाबतचे निवेदन त्यांना दिले होते. अलिबाग हे पर्यटनस्थळ असून, ते मुंबईच्या जवळ आहे. यामुळे सध्याच्या काळात पर्यटकांची फार मोठ्या प्रमाणात ये-जा ही होत असते. पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे वाहनांची कोंडी होऊन त्यांचेही हाल होत आहेत. त्यामुळे अलिबागच्या विकासाचा आणि पर्यटकांच्या होणाऱ्या त्रासाचा विचार करून अलिबाग ते वडखळ हा रस्ता दोन पदरी करावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली होती.

(संकल्पित छायाचित्र)

खंडाळा येथे पूल उभारण्याचा विचार

अलिबाग-खंडाळा मार्गावर सातत्याने होत असलेल्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी खंडाळा येथे पूल उभारण्याचा विचार केला जात आहे. पूल उभारला गेला तर वाहतूक कोंडीचा प्रश्न निकालात निघेल, असेही आ. जयंत पाटील यांनी सांगितले.

रस्त्यावर वाहनांची कोंडी

अलिबाग ते वडखळ हा रस्ता अरुंद असल्याने या रस्त्यावर वाहनांची कोंडी वाढत आहे. अलिबाग येथील वाढते आकर्षण लक्षात घेता, पर्यटकांच्या दृष्टीने अलिबाग ते वडखळ हा रस्ता दोन पदरी झाल्याने नागरिकांना वाहतुकीच्या समस्यांना दिलासा मिळेल.

आ. जयंत पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग जहाज वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केलेल्या मागणीची दखल घेत सदर रस्ता दुपदरी करण्याला मंजुरी मिळाल्याने जिल्ह्यातील जनतेसोबतच पर्यटकांनादेखील दिलासा मिळणार आहे.

दिवाळी खरेदी उत्साहाला पावसाचा ब्रेक!

(छायाचित्र : श्रेया फोटो)

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या दिवाळी सणासाठी बाजारपेठा फुलल्या आहेत. कोरोनानंतर प्रथमच बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर उत्साह दिसून येत आहे. घरोघरी गृहिणींची लगबग सुरु आहे. विविध प्रकारचे कपडे, फराळाचे पदार्थ, वस्तूंनी बाजारपेठ सजल्या आहेत. मात्र, सध्या रोजच केव्हाही कोसळणाऱ्या जोरदार पावसामुळे लोकांच्या उत्साहावर विरजण पडत आहे.

रायगड जिल्ह्यातील अनेक बाजारपेठांमध्ये रांगोळी, पणत्या, रोषणाई व फराळाच्या साहित्यापासून कपड्यांच्या खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक घराबाहेर पडत आहेत. जिल्ह्यातून तसेच परिसरातून खरेदीसाठी आलेल्या नागरिकांमुळे बाजारपेठाही फुलल्या आहेत. खरेदीच्या मूडमधील नागरिकांमुळे शहरातील अनेक चौकांमध्ये, रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत आहे. अधूनमधून जोरदार पाऊस कोसळत असला तरी उघडीप पाहून शहरासह परिसरातील सहकुटुंब नागरिक खरेदीसाठी घराबाहेर पडत असल्याने बाजारपेठेतील रस्ते हळूहळू गर्दीने फुलून जात आहेत. दिवाळी पाडव्यापर्यंत खरेदीचा हा आनंद द्विगुणित होणार आहे.

पहिल्या टप्प्यात फराळ, कपडे, पणत्या, रांगोळी, आकाश कंदील आदी साहित्य खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळत आहे. विक्रेतेही मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाले आहेत. विविध आकाराच्या आणि डिझाईनच्या चिनी मातीसह तयार पणत्यांना मागणी आहे. कागदी आणि प्लास्टिकचे आकर्षक आकाश कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. विविध रंगांच्या रांगोळीलाही मागणी आहे. लक्ष्मीपूजन आणि दिवाळीनिमित्त सजावटीचे साहित्यही बाजारात आले असून, त्या स्टॉलवरही ग्राहकांकडून खरेदी सुरु आहे.

दिवाळीसाठी कापड उद्योगात मोठी उलाढाल असते. सध्या तयार कपडे खरेदी •> पान २ वर

आनंदाचा शिधा ऑफलाईन द्या : शिंदे

। मुंबई । प्रतिनिधी

दिवाळीनिमित्त रेशन कार्डधारकांना अवघ्या १०० रुपयांत देण्यात येणारा आनंदाचा शिधा आता ऑफलाईन पद्धतीने दिला जावा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला दिलेले आहेत. अनेक ठिकाणी सर्व्हर बंद पडल्याच्या घटना घडल्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्याची दखल घेत सरकारने हा निर्णय घेतला. यामुळे आता रेशन कार्डधारकांना हा शिधा ऑफलाईन पद्धतीनेही मिळणार आहे.

धेरंड परिसरात उभारणार पेपर प्रकल्प

● २० हजार कोटींची गुंतवणूक ● राज्य सरकारची मंजुरी

। मुंबई । प्रतिनिधी ।

रायगडजिल्ह्यात सिनारमन्स पल्प या कागद निर्मितीच्या २० हजार कोटी रुपये गुंतवणुकीच्या उद्योगासह अन्य उद्योग प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आली. अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे या प्रकल्पासाठी यापूर्वीच ३०० एकर जागा देण्यात आली असून, प्रकल्पाच्या मागणीनुसार अधिकची जागा देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रकल्पस्थळ आणि परिसरात वाढणारे उद्योग आणि होणारी रोजगारनिर्मिती लक्षात घेऊन मंत्रिमंडळ उपसमितीने प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मान्यता देऊन देशातील अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प इथे आणण्यात यश मिळवले आहे.

राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपाययोजना करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक तब्बल १४ महिन्यांनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबत चर्चा झाली. सिनारमन्स पल्प या कागद प्रकल्पातून टिश्यू, पॅकेजिंगच्या कागदाची निर्मिती केली जाणार आहे. या पेपरना जगभरात १५० देशांमध्ये मागणी आहे.इंडोनेशियास्थित सिनारमन्स कंपनी आणि आशिया पेपर यांच्या संयुक्त भागिदारीतून हा प्रकल्प उभारला जाणार आहे.

या बैठकीत उद्योगांसंबंधीचे अन्य महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले. कोरोना टाळेबंदीच्या काळात ज्या उद्योगांना परताव्याचे दावे दाखल करता आले नाहीत, त्यांचे असे दावे मंजूर करण्यासाठी औद्योगिक प्रोत्साहन अनुदान योजनेचा कालावधी दोन वर्षांनी वाढविण्यात आला. उद्योगांना मार्च २०२० ते डिसेंबर २०२२ असा दोन वर्षांसाठी औद्योगिक प्रोत्साहन अनुदानासाठी कालावधी वाढवून देण्यात आला आहे. यामुळे राज्यातील अनेक उद्योगांना मोठा दिलासा मिळणार आहे.

माणूस माणसाला चावला

। पनवेल । वार्ताहर ।

शासकीय रुग्णालयात विविध व्याधींवर उपचार होत असतो. यांसह सर्पदंशासह विविध प्राणी चावल्याच्या घटना घडत असतात. यामध्ये कुत्रा, मांजर, माकड आदींसह माणसाचादेखील समावेश आहे. पनवेल उपजिल्हा रुग्णालयात या घटनांची नोंद करण्यात आली आहे.

चालू वर्षात असंख्य घटनांची नोंद उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आली आहे. यामध्ये माणूसही माणसाला चावल्याच्या घटना घडल्या आहेत. पनवेलमधील विविध घटनांत ९४० जणांना कुत्रे चावल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ४४ जणांना माकडांनी, तर २३ जणांना विंचू चावल्याचे समोर आले आहे. ९८ जणांना साप चावला असल्याचे समोर आले आहे. मात्र, पनवेलमध्ये तब्बल सात घटनांमध्ये माणूसच माणसाला चावल्याची नोंद करण्यात आली आहे. कौटुंबिक हिंसाचारातून या घटना घडत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

ऐन दिवाळीत खांदा वसाहतीत पाणीटंचाई

शेतकरी कामगार पक्ष आक्रमक

। पनवेल । वार्ताहर ।

मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असतानासुद्धा खांदा वसाहतीमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, दिवाळीचा सण सुरू झाला असतानाही सिडकोकडून मागणीप्रमाणे पाणी दिले जात नाही. यामुळे रहिवाशांमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये नाराजीचा सूर उमटला आहे. पाणीपुरवठा सुरळीत करा, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा निर्वाणीचा इशारा पक्षाचे पनवेल जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी दिला आहे.

नवीन पनवेल आणि खांदा वसाहतीत नेहमीच पाण्याची ओरड आहे. मध्यंतरी पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न सिडकोकडून करण्यात आला. परंतु, मागणीच्या तुलनेत पाणी कमी मिळत असल्याने टंचाईसदृश्य परिस्थिती वर्षभर असते. मात्र, गेल्या आठवड्यापासून सिडकोच्या पीएल ५ टाईपच्या इमारतींमध्ये पाणीच येत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. तसेच सेक्टर-९ येथील इमारतींमधील रहिवासी तीव्र पाणीटंचाईला सामोरे जात आहेत. दिवाळीचा सण सुरू झाला असतानाही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने १८ ऑक्टोबर रोजी शटडाऊन घेतला होता. दोन दिवसांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे आश्वासन एमजेपीकडून देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात आठ दिवस झाले तरी खांदा वसाहतीत पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणे होत नाही. मागणीच्या तुलनेमध्ये अत्यल्प पाणी येत आहे. त्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बोंबाबोंब सुरू आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला आहे. पक्षाचे पनवेल जिल्हा कार्याध्यक्ष महादेव वाघमारे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पाणीपुरवठा विभागाचे अभियंता सागर जगदाळे यांच्याशी संपर्क साधून या ठिकाणी पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही, तो त्वरित •> पान २ वर

विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती,सासू,सासऱ्यावर गुन्हा

। महाड । प्रतिनिधी ।

विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा पती, सासू व सासरा या तिघांवर महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा करण्यात आला आहे.

राजेवाडी बौद्धवाडी येथे ही घटना घडली. मृत विवाहित महिलेची आई वृषाली वाजेकर (रा. विन्हेरे) यांनी याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये दिलेल्या तक्रारीनुसार, मृत विवाहितेचे नाव प्रिया प्रतिश आर्डे (२३, रा. राजेवाडी बौद्धवाडी) असे असून, तिचा प्रेमविवाह २०१७ मध्ये प्रतिश आर्डे (३१) याच्या सोबत झाला होता. या विवाहानंतर प्रतिश तसेच त्याची आई विनया आर्डे व वडील विलास आर्डे हे तिघे संगनमताने प्रियाला माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावत होते. माहेरून पैसे न आणल्यामुळे त्यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली होती. अखेर या छळाला •> पान २ वर

बंदुकीच्या धाकाने चोरीचा प्रयत्न

महिलेच्या प्रसंगावधाने टळला

। उरण । वार्ताहर ।

येथील द्रोणागिरीमधील सेक्टर ५० च्या एम गोल्ड या सोन्याच्या दुकानात शनिवारी सकाळी ८.३० वाजता बंदुकीचा धाक दाखवत चोरी करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली आहे. मात्र, दुकानदार व त्यांच्या कर्मचारी महिलेने प्रसंगावधान दाखवत हा प्रयत्न हाणून पाडला. याप्रकरणी उरण पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु असून, याकरिता पोलिसांची तीन पथके सज्ज करण्यात आली आहेत.

उरण शहरालगत असलेल्या द्रोणागिरी नोडमधील सोनाराच्या दुकानात एक चोर चोरी करायला आला होता. त्याने दुकानातील महिला कर्मचाऱ्यावर बंदूक रोखली. याचदरम्यान, दुकानाच्या आतील खोलीत असलेल्या मालकाने प्रसंगावधान •> पान २ वर

फॅक्टरी फिट CNG सह अधिक फायदे मिळवा

Hyundai कडून फॅक्टरी फिट CNG कारसह अस्सल वॉरंटी, उत्तम कामगिरी आणि सुधारित सुरक्षा मिळवा

CNG मॉडेल वर 28.4kms/kg ARAI प्रमाणित मायलेज.*

डिलिव्हरी लवकर मिळण्याची खात्री*

Grand i10 NIOS
पर्यंत लाभ ₹ 33 000* (CNG)

AURA
पर्यंत लाभ ₹ 33 000* (CNG)

- 100% ऑन रोड फायनान्स*
- प्रक्रिया शुल्क सुट*
- उत्तम मायलेज
- पेट्रोल भरण्याच्या क्षेत्राजवळ सोयीस्कर इंधन भरण्याचे वाल्व स्थान
- क्लस्टरमध्ये CNG इंधन पातळी निर्देशक
- CNG अनुरूप इंजिन घटकासह वर्धित टिकाऊपणा
- अधिक राइड आरामासाठी ट्यून केलेले सस्पेंशन

HYUNDAI

Give a missed call on 9555295868 | Lowest cost of maintenance## | Hyundai Mobility Membership | 3 YEARS •1 00 000 km Warranty** •Road Side Assistance (RSA)

*Terms & Conditions apply. Factory fitted CNG powertrain option available in GRAND i10 NIOS (Magna MT & Sportz MT variants) and AURA (S MT variant).**3 years warranty or up to 1 00 000 kms whichever is earlier. ##Lowest average yearly periodic maintenance service cost starts at ₹2 721 (Grand i10 NIOS Petrol in Kalyan for 5 years). Source: Cardekho.com. Hyundai is also available in CSD and GeM, contact us at ajitrana@hmil.net. HMIL reserves the right to withdraw / modify the scheme without prior notice. Finance Scheme from SBI Bank only. Features and specifications as shown may not be part of standard fitment and are subject to change without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.

शरयू ह्युंदाई
तुर्भे, Ph: 022 48964182
पेण वडखळ, Ph: 080473 63111, 091679 50080, 091679 50074, 099304 66946

विशाल ह्युंदाई
पनवेल, Ph: 084228 10900, 084228 10901
अलिबाग, Ph: 084228 10984, 084228 10904

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ ऑक्टोबर

१) श्री.कृष्णाजी लक्ष्मण आचर्य
संजलाम नगर,
पिंपळभाट, अलिबाग
२३ ऑक्टोबर १९३३

२) श्री.विश्वनाथ दामोदर वर्तक
अवधूत सो.दुसरा मजला
२३ ऑक्टोबर १९३३

जिल्हा परिषदांमधील १३ हजार रिक्त पदांची प्रक्रिया रद्द

भरती प्रक्रियेसंबंधीची माहिती सरकारकडून गहाळ

। नागपूर । प्रतिनिधी ।

राज्यातील २० लाख तरुण ज्या नोकरभरतीची आतुरतेने वाट पाहात होते ती जिल्हा परिषदांमधील १३ हजार ५१४ रिक्त पदांची भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. भरती प्रक्रियेला विलंब झाल्याने आणि आरक्षणाबाबतच्या गोंधळामुळे सदर निर्णय घेतल्याचं सरकारकडून सांगण्यात आलं आहे. मात्र या भरती प्रक्रियेसंदर्भातील माहितीच ग्रामविकास विभागाकडून गहाळ झाल्याने राज्य सरकारने हा निर्णय घेतल्याचे समजते. सरकारच्या या निर्णयामुळे भरतीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या तरुणांचा हिरमोड झाला असून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेतील गट क मधील १८ संवर्गातील १३ हजार ५१४ पदांसाठी महापरीक्षा वेबसाइटवर २० लाखांहून अधिक उमेदवारांनी अर्ज केले होते. मात्र, महापरीक्षा वेबसाइटवरील गोंधळानंतर ते बंद करून नव्याने पत्रक काढत शासनाच्या ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेच्या भरतीचे काम 'न्यास कंपनीला' दिले. त्यानुसार या कंपनीने आरोग्य विभागातील भरतीचे काम घेतले होते. परंतु भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याने राज्यभरात तीव्र विरोध दर्शवण्यात आला आणि त्यानंतर तत्कालीन आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी आरोग्य भरती रद्द करण्याचा निर्णय घेतला. मात्र जिल्हा परिषदेतील १३ हजार पदांची सर्व माहिती न्यास कंपनीकडे देण्यात आली होती. त्यानंतर ग्रामविकास विभागाने मे २०२२ मध्ये सर्व जिल्हा परिषदांनी भरतीसाठी गरजेची असलेली माहिती कंपनीकडून गोळा करावी, अशा सचूना करत आपली जबाबदारी झटकली.

शुल्क परत मिळणार

जिल्हा परिषदांमधील पदभरतीसाठी उमेदवारांनी अर्जापोटी भरलेले परीक्षा शुल्क जिल्हा परिषदांच्या मार्फत परत करण्यात येणार आहे. हे शुल्क परत करण्याच्या कार्यपद्धतीबाबत जिल्हा परिषदांना स्वतंत्रपणे कळवण्यात येईल, असं शासनाने घेतलेल्या निर्णयात स्पष्ट करण्यात आलं आहे.

महत्त्वाचे

प्रा. कृष्णा सावंत यांना उर्दूतील पदव्युत्तर पदवी

। आपटा । वार्ताहर ।

नवीन पनवेल येथील प्रोफेसर कृष्णा आर सावंत यांनी २०२०-२२ या शैक्षणिक वर्षात मुंबई विद्यापीठातून उर्दू साहित्यातील पदव्युत्तर पदवी प्रथम श्रेणीत यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. सावंत मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून मानसशास्त्र आणि समाजशास्त्राचे पदवीधर आहेत. त्यांनी १९९४ मध्ये मुंबई विद्यापीठातून लेबर स्टडीजमध्ये पदव्युत्तर पदवी आणि त्यानंतर २०१४ मध्ये मार्केटिंगमध्ये बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे मुख्य सामर्थ्य कोचिंग, समुपदेशन आणि व्यवस्थापन विकास कार्यक्रमांमध्ये आहे.

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट एकची लांबी वाढणार

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबतात. त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. याबाबत पंकज ओसवाल यांनी मध्य रेल्वे प्रशासनाकडे विचारणा केली असता या फलाटाची लांबी मार्च २०२४ पर्यंत वाढविण्यात येणार आहे असे लेखी उत्तर देण्यात आले आहे.

रेल्वे स्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एक वर मुंबईहून पुण्या कडे जाणाऱ्या गाड्या येत असतात. परंतु या फलाटाची लांबी कमी असल्यामुळे जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची खूप धावपळ होते. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता असते. नुकतेच कर्जत रेल्वे स्थानकावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. दोन वेळा गाडी थांबत असल्याने रेल्वे प्रशासनाला एकाचं ठिकाणी डबे दर्शविणारे दोन इंडिकेटर्स बसवावे लागले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी कधी गाडी चुकते, तर कधी समान फलाटावर राहते.

या होणाऱ्या त्रासाबद्दल कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनीं रेल्वे प्रशासना कडे विचारणा केली असता रेल्वे प्रशासनाने सदर फलाट ची लांबी वाढविण्याचे काम मार्च २०२४ पर्यंत करण्यात येणार असल्याचे ओसवाल यांना कळविले आहे.

खोपोली विश्रामगृह परिसरात उद्यान उभारण्याची मागणी

। खोपोली । वार्ताहर ।

खोपोलीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्रामगृह परिसरात सुसज्ज उद्यान विकसित केले जावे,अशी मागणी रिपाईंतर्फे करण्यात आली आहे. तसे निवेदन बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांना देण्यात आले आहे.

आरपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडीक यांनी हे निवेदन सादर केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष जगदीश गायकवाड, खोपोली शहर अध्यक्ष नितीन वाघमारे उपस्थित होते. विश्रामगृहाची सध्या अतिशय दुरवस्था झाली आहे. विश्रामगृहाची संरक्षक भिंत ढासळलेली आहे. विश्रामगृहाच लोखंडी प्रवेशद्वाराला मोठमोठी दगडे लावून आधार देण्यात आला आहे. याशिवाय विश्रामगृहाचा परिसर पूर्णपणे पालापाचोळा आणि कचऱ्याने भरून गेला आहे. याठिकाणी खानसामा, सुरक्षारक्षक नसल्याने रात्रीच्या वेळेस या इमारतीचा गैरवापर होत आहे.

आज खोपोलीत जागेचे भाव गगनाला भिडले असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील अडीच एकर जागेत असलेल विश्रामगृह मरणासन्न अवस्थेत आहे, असे यामध्ये नमूद करण्यात आले आहे. या ठिकाणी सुसज्ज उद्यान उभारण्यासाठी बांधकाम विभागाने विश्रामगृहाची जागा खोपोली नगर परिषदेस हस्तांतरीत करावी आणि सदरील जागेत सुसज्ज उद्यान उभारल्यास लहान मुले आणि वयोवृध्दांसाठी विरंगुळ्यासाठी सोय होईल, असेही महाडीक यांनी सांगितले आहे.

महिला बचत गटांना सक्षम करणार : तटकरे

। म्हसळा । वार्ताहर ।

घोणसे घाटाच्या पायथ्याशी ग्रामपंचायत घोणसे अंतर्गत वसलेल्या सात वाड्यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत सुमारे १ कोटी ८९ लाख मंजुरी खर्चाचे नळपाणी योजनेचा भूमिपूजन आणि ग्रामपंचायत कार्यालय इमारत - १० लक्ष, व अंगणवाडी इमारत - ८.५० लक्ष या दोन इमारतींचे उद्घाटन खासदार सुनिल तटकरे यांचे हस्ते संपन्न झाले.

यावेळी तटकरे यांनी पाण्याची समस्या संपली आणि पाणी भरताना होणारा त्रास कमी झाला की महिला आपोआपच वेगवेगळ्या व्यवसायाकडे वळतील त्यामुळे महिला बचत गटांना प्राधान्य देऊन त्यांच्यासाठी बचतगट भवन इमारत बांधून वेगवेगळ्या स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण केले जाईल, अशी ग्वाही दिली. यावेळी सरपंच रेशमा कानसे, समीर बनकर, महेश शिर्के, बबन मनवे, छाया म्हात्रे, संदीप चाचले, सुनिल महाडिक, घोणसे सात वाड्यांचे अध्यक्ष, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे बळीराजा मेटाकुटीला

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यात वन्य माकडे व डुकरांकडून भातशेतीची नासधूस सुरू असून वन्यप्राण्यांच्या या त्रासामुळे बळीराजा मेटाकुटीला आला आहे. तालुक्यात भातशेती हा उत्पन्नाचा एकच साधन असल्यामुळे येथील बहुतांश नागरिक शेती करून आपला उदरनिर्वाह भागवितात. मात्र शेती करताना दिवसेंदिवस येणाऱ्या अडचणींमुळे येथील शेतकरी वर्ग बेजार झाला आसून दिवसेंदिवस शेतीचे प्रमाण घटत चालले आहे.

गेल्यावर्षी तळा तालुक्यात २१०० हेक्टर वर भातशेतीची लागवड करण्यात आली होती. मात्र यावर्षी ती कमी होऊन १६०० हेक्टर पर्यंतच भात लागवड करण्यात आली आहे. यावर्षी सुरुवातीला मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे

भातशेती चांगलीच बहरली असली तरी परतीच्या पावसामुळे या भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता आहे.

दररोज दुपारनंतर पावसाचे आगमन होत असल्याने नागरिकांकडून लवकरात लवकर भातशेती कापणी कशी होईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मात्र वन्य माकडे आणि रानटी डुकरे यांच्याकडून भातशेतीची मोठ्या प्रमाणावर नासधूस केली जात आहे.आधीच परतीच्या पावसामुळे संकटात सापडलेल्या बळीराजाला वन्यप्राण्यांचादेखील त्रास सहन करावा लागत असून, या वन्य प्राण्यांमुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो की काय, अशी चिंता बळीराजाला सतावू लागली आहे.

दिवाळी फराळ साहित्याचे रेवदंडा येथे वाटप

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

सामाजिक कार्यकर्ते रायगड भूषण शरद गोंधळी यांच्या स्तुत्य उपक्रमाने रेवदंडा येथील श्री काळभैरव मंदिराचे प्रांगणात दिवाळी फराळ साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने गरजू व गरीब लोकांनी दिवाळी फराळ साहित्य वाटप कार्यक्रमांचा लाभ घेतला. यावेळी उपसरपंच मंदाताई बळी, अशोक नाईक, सुहास घोणे, जनार्दन कोंडे, सुरेंद्र गोंधळी, प्रसाद गोंधळी, औदुबंर गोंधळी, भगवान तांबडकर, तुकाराम चुनेकर, आदी मान्यवर मंडळीची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजू नाईक सर यांनी केले. या मध्ये दिवाळी फराळासाठी आवश्यक असे रवा, मैदा, आदी वस्तूंचे वितरण केले जाते. यावर्षी फक्त केसरी कार्डधारकांनाच दिवाळी फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले.

'आनंदाचा शिधा' किटचे नागोठण्यात वाटप

। नागोठणे । वार्ताहर ।

रोहा तहसील अंतर्गत नागोठणे ग्रामपंचायतीमधील बाजारपेठेत असलेल्या नागोठणे क्र. ४ या शिधावाटप दुकानात आनंदाचा शिधा किटचे वाटप आम.रविंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नरेंद्र जैन, सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, मारुती देवरे, किशोर म्हात्रे, नायब तहसीलदार,उज्वला भोईर, अव्वल कारकून अभिजित महाडिक, गोदाम व्यवस्थापक दर्शना पाटील, लेखनिक पूजा जोशी, जुगन जैन, मनोज खांडेकर, प्रवीण ताडकर, शहर प्रमुख अमित खामकर, मंदार कोतवाल, रोशन उंबरे, मयुर ढाणे, आकाश मढवी, शिधा केंद्र संचालक हसमुख हरकचंद जैन, कमलेश जैन आदींसह नागरिक यावेळी उपस्थित होते.

अंत्योदय व केशरी कार्डधारकांना हे शिधा संच वाटप केले जाणार आहेत. नागोठणे क्र. ४ या केंद्रावर ७४० शिधा किट देण्यात आले असून नागोठणे शहरासह विभागातील इतर शिधा वाटप दुकानांतही लवकरात लवकर हे वाटप करण्यात येईल असे नायब तहसीलदार उज्वला भोईर यांनी सांगितले. दरम्यान शनिवारपासून दिवाळी सुरू झाली असली तरी सरकारचे हे साहित्य सर्वत्र पोहचलेले नाही. जेथे पोहचले तेथे वाटप सुरू झाले. मात्र जिथे सामान अजून पोहचले नाही तेथे प्रतिक्षा करावी लागत असल्याने नागोठण्यासह रोहा तालुक्यात या शिधा वाटप किट च्या बाबतीत कही खुशी, कही गम असे चित्र दिसून येत आहे.

पान १ वरुन

दिवाळी खरेदी उत्साहाला पावसाचा ब्रेक!

करण्याकडे ग्राहकांचा कल आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत तयार कपडे उपलब्ध झाल्याने अशा दुकानात गर्दी पहायला मिळत आहे. वेगवेगळ्या आकारात आणि रंगात पणत्या विक्रीसाठी रस्त्याच्या दुतर्फा विक्रेते बसलेले आहेत. मोबाईल, टीव्हीसह इतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या शोरुमसमोर खास मंडप उभारण्याचे काम सुरु असले तरी त्यात रोजच्या पावसाचा व्यत्ययही येत आहे.

दिवाळीनिमित्त विविध वस्तूंच्या दुकाने व बाजारासह दुचाकी, चारचाकी वाहनांच्या कंपन्यांकडून आकर्षक ऑफर्स जाहीर झाल्या आहेत. रोज सायंकाळी पडणाऱ्या पावसाने निरुत्साहाचे वातावरण होत असून, काही बाहेरगावचे नागरिक अशा पावसातच खरेदी करुन परतत आहेत. या पावसाचा फटका रस्त्यावरील विविध विक्रेत्यांना बसला आहे. दिवाळी सुट्टीत चिमुकली मंडळी किल्ले उभारण्यात मग्न असली तरी पावसाने त्यांच्या या कामात व्यत्यय येत आहे. किल्ल्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, मावळ्यांचे पुतळे बाजारात दाखल झाली आहेत. शिवराय व मावळ्यांचे छोटे-छोटे पुतळे खरेदी सुरु आहे.

दिवाळी आणि मिठाई हे समीकरण हे ठरलेलेच आहे. ऑनलाईन खरेदीपेक्षा यावेळी ग्राहकांनी प्रत्यक्ष खरेदीवर पसंती दाखवली आहे. त्यामुळे बाजारपेठ सर्वत्र फुलेली दिसून येत आहे. बाजारपेठेमध्ये विविध प्रकारचे आकाश कंदील, दिवे, रंगीबेरंगी विद्युत माळा, रांगोळी, फराळ, मिठाई तसेच इलेक्ट्रॉनिक्स वस्तू बाजारपेठेमध्ये विक्रीसाठी आलेल्या आहेत. घरोघरी दिवाळीच्या फराळासाठी विविध पदार्थ तयार करण्यात महिला व्यस्त झाल्या आहेत. घरी बनवल्या जाणाऱ्या फराळासाठी लागणारे मसाले तसेच काजू, बदाम, पिस्ता, मनुका, अक्रोड या सुक्या मेव्यासह अनेक प्रकारच्या मिठाईची बाजारपेठेत विक्री वाढली आहे. दागिने, कपडे, गिफ्ट खरेदीसाठी ग्राहकांनी बाजारपेठ फुलली आहे.

ऐन दिवाळीत खांदा वसाहतीत पाणीटंचाई

सुरळीत करा, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा सिडको कार्यालयावर मोर्चा काढून रहिवासी आंदोलन करतील, असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शटडाऊन घेतल्यामुळे पाणीपुरवठा कमी दाबाने होत आहे. परंतु, सिडकोकडून पंपिंग केले जात आहे, ज्या ज्या ठिकाणी अडचणी असतील, त्या त्वरित निकाली काढण्यात येतील, अशी ग्वाही वाघमारे यांना सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाचे अधिकाऱ्यांनी दिली आहे. परंतु, जर पाणीपुरवठा योग्य पद्धतीने झाला नाही, तर मोठे आंदोलन करू, अशी भूमिका शेतकरी कामगार पक्षाने खांदा वसाहतीतील पाणीप्रश्नासंदर्भात घेतली आहे.

विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पती,सासू,सासऱ्यावर गुन्हा

कंटाळून प्रिया हिने १४ ऑक्टोबरला आपल्या घरी लाकडी भालाला गळफास लावून आत्महत्या केली. आपल्या मुलीच्या आत्महत्येला जबाबदार असल्याप्रकरणाची तक्रार तिच्या आईने पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलिसांनी तिचा पती सासरा व सासू या तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रेखा जगदाळे करत आहेत.

बंदुकीच्या धाकाने चोरीचा प्रयत्न

राखत अलार्म दाबल्याने चोराने तात्काळ पलायन केले. यावेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या इनोवा गाडीतून चोराने पलायन केले असून, मालकाच्या समयसूचकतेमुळे चोरीची घटना टळली. या घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपासास सुरुवात केली आहे. सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

सायबर दहशतवादप्रकरणी आरोपीला जन्मठेप

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीकेसी येथील अमेरिकन स्कूल ऑफ बॉम्बे येथे बॉम्बस्फोट घडवण्याचा कट रचल्या प्रकरणी आणि जिहादी विचारसरणीचा प्रचार केल्याप्रकरणी कुर्ला येथील एका २८ वर्षीय संगणक अभियंत्याला विशेष न्यायालयाने दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली.अन्सारीला २०१४मध्ये महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने अटक केली होती. तेव्हापासून तो तुरुंगातच आहे. सायबर दहशतवाद प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा होण्याची देशभरातील ही पहिलीच घटना आहे. तो आयएएस या दहशतवादी संघटनेचा समर्थक होता. फेसबुकवर उमर एल्हाजीसोबत केलेल्या चॅटिंगमधून अन्सारी एका अमेरिकी शाळेवर लोन वुल्फ हल्ला करण्याच्या तयारीत होता, असं उघड झालं आहे. कट उधळून लावल्यानंतर पहिल्यांदाच महाराष्ट्रात सायबर दहशतवादअंतर्गत शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसंच, हे देशातील पहिलं प्रकरणं आहे ज्याची तक्रार सायबर दहशतवादअंतर्गत दाखल करण्यात आली होती.

सेवानिवृत्तांना निवडणुकीचे वेध

। श्रीवर्धन। प्रतिनिधी।

श्रीवर्धन तालुक्यातील काही सेवानिवृत्त कर्मचारी ,ज्येष्ठ नागरिक आगामी काळात येणा-या जिल्हा परिषदा,पंचायत समित्या,नगर परिषदा,नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उमेदवारीकरण्याच्या विचाराप्रत आले आहेत,इतकेच नव्हे तर काही राजकीय पक्षांनी त्यांचेशी या संदर्भात संपर्कही केला आहे श्रीवर्धन शहरांत,तालुक्यात ब-याच ठिकाणी अशा प्रकारची चर्चा आहे. या चर्चांमध्ये कितपत तथ्य आहे ते येणारा काळच ठरवील.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Commercial /Professional/Function Hall/ Office premises on rental at Alibag, Raigad. Rexine materials and articles at wholesale rate. anytime contact-9226379844
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधुवरांची नावनोंदणी सुरू ४४ शाखा, वेबसाईट नोंदणी-९२२६७६६१२९, ९३७०५१७९४९
- इंग्लिश बोलण्याचे शास्त्रशुध्द मार्गदर्शन विनाअट देणारे ज्ञानकेंद्र - ९८२२८४२८१०
- बिन शेती (N.A) प्लॉट विकणे आहेत.प्रती गुंठा २० लाख रुपये. सनस्टोन रॉयल इस्टेट. साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड मोबा. ८६६९००६९०२
- विवाह, पुर्नविवाह, सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा-गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- हवेशीर भरपूर प्रकाश, पूर्व-पश्चिम, 1BHK सुसज्ज फ्लॅट ६८५ sqft डॅफोडिल्स सोसायटी, गोंधळपाडा विकणे आहे. संपर्क : राईलकर ७७९८४३८८५५
- कॉलेज ऑफ आय.आय.टी. अलिबाग प्रवेश चालू आहेत ऑटोकॅड 2D,3D इन्टीरिअर डिझायनिंग,3Ds,Max. c and c++,c# Advance Java, HTML, Vb [Dot] Net, ASP. [Dot] Net. DTP, Tally 100% job Assistance. संपर्कः- कॉलेज ऑफ आय.आय.टी.अलिबाग. जुन्या नगरपालिकेसमोर. फोन ९९७०६६६३६९, ८३७९९७०५३७
- पार्टटाईम/फुल टाईम ऑफिस कामासाठी विवाहीत महिला पाहिजे. ७४४७४८०००

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

म ह त्त्वा चे

उटण्याचे वाटप

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील ऐतिहासिक चिरनेर गावातील महागणपती डेकोरेशनचे संचालक सचिन घबाडी व चिरनेर ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या शीतल घबाडी यांनी सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचे दर्शन घडविले आहे. गेली पाच वर्षे हे दाम्पत्य चिरनेर गाव व येथील आदिवासी बांधवांच्या वाड्यात सुगंधी उटण्याचे वाटप करीत आहेत. यावर्षीही त्यांनी एक हजार सुगंधी उटण्याच्या पाकिटांचे वाटप केले आहे.

'अतिक्रमणांवर कारवाईची करा'

। उरण । वार्ताहर ।

उरण नगरपालिका हद्दीतील दुकानदारांनी गटारावर व भर रस्त्यात साहित्य ठेवून अतिक्रमण केले आहे. तरी या दुकानदारांवर कारवाई करून अतिक्रमण हटविण्याची मागणी जनतेकडून जोर धरू लागली आहे. दोन दिवसांवर दिवाळी आली असताना याकडे नगरपालिका दुर्लक्ष करीत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. संबंधित दुकानदारांना कोणी सामान आत ठेवण्यास सांगितले, तर ते अरेरावीची भाषा वापरत हलविणार नाही अशी धमकी देताना दिसतात. याबाबत नगरपालिका पदाधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणूनही ते याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहे.

दिघी प्रकल्पात परप्रांतियांचा भरणा

स्थानिकांच्या रोजगारासाठी कृती समिती स्थापणार

● रा.काँ., काँग्रेस, शेकाप व शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांचा निर्धार

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

सुमारे छत्तीसशे कोटींचा दिघी बंदर प्रकल्प हा श्रीवर्धन व मुरुड तालुक्यात असताना या प्रकल्पात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून न देता परस्पर परप्रांतियांच्या भरत्या केल्या जात आहेत. स्थानिक तरुणांना त्यातून डावलले जात आहे, तसेच या प्रकल्पाचे आगरदांडा येथील काम बंद पडल्याने येथील अनेक स्थानिकांवर आलेले बेरोजगारीचे संकट दूर करण्यासाठी मुरुड तालुक्यातील विविध पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येऊन एका कृती समितीची स्थापना करण्याचा निर्धार केल्याचे शुक्रवारी मुरुडमधील शोअर लाईन हॉटेलमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुरुड तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी पुढाकार घेऊन तालुक्यातील रा.काँ.सह काँग्रेस, शेकाप, शिवसेना-उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांना एकत्र आणून ही कृती समिती स्थापन करण्याचे ठरवल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले. याप्रसंगी दांडेकर यांच्यासह काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुभाष महाडिक, शहराध्यक्ष नाना गुरव, शेकापचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य मनोज भगत, तालुका चिटणीस अजित कासार, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख नौशाद दळवी, माजी उपसभापती चंद्रकांत मोहिते, माजी नगरसेवक प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, विजय पैर, डॉ. विश्वास चव्हाण, बाबा दांडेकर, ॲड.मृणाल खोत, माजी नगरसेविका प्रमिला माळी, अजगर दळवी, सुदेश वाणी आदी नेते उपस्थित होते.

विद्यमान खासदार सुनिल तटकरे, माजी खासदार अनंत गीते, आमदार जयंत पाटील, कामगार नेते तथा रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, आ. आदिती तटकरे, अनिकेत तटकरे, माजी आ. पंडित पाटील आदींना बरोबर घेऊन लवकरच स्थापन होणाऱ्या कृती समितीने दिघी पोर्टच्या व्यवस्थापकांची भेट घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले.

सन २००७ मध्ये या प्रकल्पाचे काम विजय कलंत्री यांना देण्यात आले होते. त्यांनी चार-पाच वर्षे ते सुरळीतपणे चालवले, नंतर ते बंद पडले. सध्या देशातील मोठ्या अदानी ग्रुपकडे सोपविण्यात आले आहे. प्रकल्प सुरू होताच स्थानिकांनी या परिसरात अनेक लहान-मोठे उद्योगधंदे सुरू केले. प्रकल्पकाला आवश्यक त्या वाहनांची खरेदी केली. त्यासाठी स्थानिक बँकांकडून कर्जे घेतली; परंतु प्रकल्पाच्या आगरदांडा भागातील काम बंद पडल्याने या सर्वांवर सध्या उपासमारीची वेळ आली आहे. बेरोजगारी वाढली आहे. प्रकल्पात काम करण्यासाठी परप्रांतियांच्या भरत्या केल्या जात आहेत. त्याचा परिणाम स्थानिकांवर झाला आहे. स्थानिक प्रशिक्षित तरुण रोजगारासाठी आपली राहती घरे सोडून मुंबई, पुण्याकडे धाव घेत आहेत. प्रकल्पाला आवश्यक प्रशिक्षित उमेदवारांची वानवा असल्याचे सांगून बाहेरची माणसे भरली जात आहेत. स्थानिकांना न्याय मिळवून देण्यासाठीच मुरुडमधील सर्वपक्षीय मंडळींना एकत्र आणून लढा उभारण्याचा मानस कृती समितीचे निमंत्रक मंगेश दांडेकर यांनी यावेळी बोलून दाखवला.

एकीकडे इकोसेन्सेटिव्ह झोन व दुसरीकडे सिआरझेड कायद्यात हा तालुका अडकल्याचे अजित कासार यांनी सांगितले. सर्वच पक्षांच्या वरिष्ठांशी बोलून त्वरित कृती समिती स्थापन करण्याचे आवाहन मनोज भगत यांनी करुन गेल्या दीड वर्षात अदानींकडून कोणतीही ठोस कामे न झाल्याचा आरोप केला. यावेळी अन्य पक्षाच्या नेत्यांनीही आपले विचार मांडले.

'दिवाळी पहाट'चे शेकापकडून आयोजन

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जेएनपीटी मल्टिपल सभागृहात सोमवार, दि. २४ आक्टोबर रोजी 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. उरण तालुका चिटणीस विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटे ६ वाजता गायक गणेश घरत, लीना अभ्यंकर, पखवाज क्रीश ठाकूर, तबला जयदास ठाकूर, हार्मो नियम मिलिंद म्हात्रे, टाल प्रकाश जोशी यांच्या साथीने कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वस्त कामगार नेते भूषण पाटील यांच्या हस्ते, तर प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती माजी सभापती महादेव बंडा उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाचे सर्व पदाधिकारी, चिटणीस मंडळ, आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी नगरसेवक, विविध सेलचे पदाधिकारी, महिला आघाडी कार्यकर्ते तसेच रसिक प्रेक्षक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका चिटणीस विकास नाईक यांनी केले आहे. सध्या या कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू आहे.

परदेशी पाहुणे रमले भारतभूमीच्या मातीत

विद्यार्थ्यांसोबत बनवले मातीचे दिवे

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सणात लहान मुले मातीचे दिवे, गडकिल्ल्यांची प्रतिकृती बनवीत असतात. अशातच परदेशी पाहुणे दिवाळीत आले आणि त्यांच्यासमवेत मातीच्या वस्तू बनविण्याची संधी मिळाली तर मुलांच्या आनंदाला पारावर उरत नाही. पालीतील जॅक अँड जिलच्या विद्यार्थ्यांना या दिवाळीत असा आगळावेगळा आनंद अनुभवयास मिळाला.

दिवाळीत परदेशी अमेरिकन पाहुणे भारतभूमीच्या मातीत रमल्याचे पहावयास मिळाले. पालीत जॅक अँड जिलच्या विद्यार्थ्यांसोबत मिसळून त्यांनी मातीचे दिवेदेखील बनविले. जॅक अँड जिल च्या संचालिका तथा प्रिन्सिपल प्रभा द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. लहान मुले दिवाळीत दिव्यांचा प्रकाश नेहमीच पाहतात, मात्र हे मातीचे दिवे कसे बनतात, कसा आकार घेतात, हे त्यांना माहीत नसते, जॅक अँड जिल शाळेत मातीचे दिवे कसे बनवितात याचे प्रात्यक्षिक दिले. मातीशी खेळत ही मुले खूप आनंदात व उत्साहात दिवे बनवत होती. आजकालच्या मुलांचे मातीशी नाते तुटले व मोबाईल हाती आले. विशेष म्हणजे परदेशी पाहुणे ही कुतूहलाने दिवे बनवायला शिकत होते.

> दिवाळी हा सण जीवनात आनंद, सकारात्मक ऊर्जा व प्रकाश आणणारा सण आहे. दिवाळीत भारतमातेच्या मातीला मान द्या. येथील मातीने बनविलेल्या दिव्यांनी ही भूमी प्रकाशमय करा, मातीच्या दिव्यांनी भारतभूमी तेजोमय करून टाकूयात.
> – प्रभा द्रविड, संचालिका, जॅक अँड जिल

तुषार केळकर व दोन अमेरिकन पाहुण्या या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. जॅक अँड जिलच्या संचालिका तथा प्रिन्सिपल श्रीमती प्रभा द्रविड व त्यांचे सहकारी प्रणाली शेठ, शिल्पा जतीन पाटील, व इतर स्टाफ उपस्थित होता.

■ स्वच्छ भारत अभियान घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत कुरुळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ओला व सुका कचरा गोळा करण्यासाठी घरोघरी मोफत डस्टबिनचे प्रायोगिक तत्त्वावर वाटप करण्यात आले. यावेळी माजी जि.प. सदस्या प्रियदर्शनी पाटील, कुरुळच्या उपसरपंच स्वाती पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. हे डस्टबिन ग्रामस्थांना घरपोच करण्यात येणार आहेत.

दिवाळीनिमित्त कार्यक्रम

। माणगाव । प्रतिनिधी ।

तालुक्यातील निजामपूर विभाग सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व बाबूशेठ खानविलकर मित्रमंडळाच्यावतीने निजमापूर येथे जुनी बाजारपेठ याठिकाणी सोमवार, दि.२४ ऑक्टोबर रोजी सकाळी ५.३० वाजता दिवाळी पहाट व ज्येष्ठ नागरिक यांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, दिवाळी पहाट कार्यक्रमाचा रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटावा, असे आवाहन बाबूशेठ खानविलकर यांनी केले आहे.

दिवाळी पहाट कार्यक्रमात रोहित पाटील प्रस्तुत दिवाळी पहाट मैफिल तू सप्तसूर माझे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध कलाकार एकाच मंचावर येणार आहेत. यामध्ये एकच राजा इथे जन्माला.. फेम गायक रोहित पाटील, कलर्स मराठी सूर नवा ध्यास नवा विजेती झी टीव्ही हिंदी-सारेगमप फेम गायिका अंशिका चोणकर, गायिका रेश्मा पाटील, गायक मुकेश उपाध्ये, नवीन मोरे आदी कलाकार भक्तीगीत, भावगीत, कोळीगीत व लोकगीतांचा नजराणा कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.

पेण अर्बन बँक संघर्ष समिती सदस्यांची दिवाळीनंतर मुख्यमंत्र्यांसोबत बैठक

। कर्जत । प्रतिनिधी ।

पेण अर्बन बँक संघर्ष समिती सदस्य आणि ठेवीदार यांची सभा आ. महेंद्र थोरवे यांच्या कार्यालयात पार पडली. यावेळी संघर्ष समितीच्या सदस्यांनी व्यथा मांडल्या. त्यावर आ. थोरवे यांनी दिवाळीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

पोसरी येथील शिवतीर्थ कार्यालयात संघर्ष समितीचे सदस्य व ठेवीदार यांनी आ. थोरवे यांची भेट घेतली. त्यावेळी समितीचे सचिव चिंतामणी पाटील, सदस्य प्रदीप शहा, मोहन सुर्वे यांनी बँकेच्या सद्यः स्थितीची माहिती सांगितली. बँकेचा आर्थिक घोटाळा ७५३ कोटी रुपयांचा आहे. बँकेची मिळकत जमीन सुमारे दोन हजार कोटी रुपयांची आहे. आत्तापर्यंत ५५४ ठेवीदार मरण पावले आहेत. आम्हाला याबाबतीत मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा' अशी विनंती केली. यावर दिवाळीनंतर लगेचच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात येईल, असा शब्द दिला.

याप्रसंगी धनंजय देशमुख, श्रीकांत दिवेकर, दिपक साळ्ये, शांतीलाल रावळ, नगरसेवक संकेत भासे, तालुका प्रमुख संभाजी जगताप, अभिषेक सुर्वे आदींसह ठेवीदार उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना सुगंधी उटणे, साबण बनवण्याचे धडे

। कर्जत । प्रतिनिधी ।

माजी आ. स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान आणि ज्योविस आयुर्वेदा दादर-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नारी सामाजिक संस्थेच्या सहकार्याने कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक सुगंधी उटणे व साबण तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

कडाव येथील हुतात्मा हिराजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयुर्वेदिक सुगंधी उटणे व साबण तयार करण्याच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. नारी सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष डॉ. ज्योती सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे, तिरुपती बालाजी मंडळाचे तानाजी पाटील, अशोक भोईर, अदिती शिंदे आदी उपस्थित होते. शिक्षिका वैष्णवी ठोंबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. योगिता जाधव यांनी सूत्रसंचालन, तर सतीश मराडे यांनी आभार प्रदर्शन केले.

याप्रसंगी सपना बेलेकर, आशा जाधव, श्याम शेळके, नंदकुमार माळी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंबा पिकावरील विम्याचा प्रिमियम कमी करावा

चंद्रकांत मोकल यांची कृषीमंत्र्यांकडे मागणी

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

केंद्र व राज्य शासनाचा सहभाग असलेली आंब्यासाठी फळपिक विमा योजना आहे. मात्र यामध्ये सम हवामान असलेल्या कोकणातच विषमता आहे. मागील वर्षापासून विम्याचा प्रिमियम वाढविला आहे. आश्चर्य म्हणजे १९२०-२१ सालापर्यंत रायगड जिल्ह्यासाठी एका झाडासाठी प्रिमियम रु.७० होता म्हणजे हेक्टरी रु. ७००० होता. २०२१-२२ सालापासून तो एकदम चार पट वाढविण्यात आला. म्हणजे, एका झाडाला रु. २९४ तर हेक्टरी रु. २९,४०० करण्यात आलेला आहे. तो तातडीने कमी करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे केली आहे.

ते पुढे म्हणाले की, हाच दर रत्नागिरी जिल्ह्यासाठी हेक्टरी रु. १३,५०० व सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रु. १३,३०० आहे . अशाप्रकारे पूर्वी कोकणासाठी एकच दर होता. कारण रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड जिल्ह्याचे हवामान जवळपास सारखेच आहे. मागील वर्षापासून रायगड जिल्ह्यासाठी ४ पट प्रिमियम हा अवास्तव असल्यामुळे तो कमी व्हावा यासाठी जिल्हाधिकारी डॉ . महेंद्र कल्याणकर यांच्याकडे मागील वर्षी पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी आयुक्त कृषी पुणे यांना तो कमी करण्याबाबत लेखी निवेदन दिले होते. या अनुषंगाने कृषी आयुक्त पुणे यांच्याबरोबर शेतकऱ्यांची मिटिंग झाली. मात्र, प्रिमियम कमी करण्यात यश आले नाही. तत्कालीन कृषीमंत्री दादाजी भुसे यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे अनेकदा पाठपुरावा केला. मात्र प्रिमीयम कमी झाला नाही. त्यामुळे नाराज शेतकऱ्यांनी विमा उतरविण्यात अनास्था दाखविली. आश्चर्य म्हणजे, जिल्ह्यातील सुमारे छपन्न हजार शेतकऱ्यांपैकी अवघ्या सहा हजार शेतकऱ्यांनी विमा उतरविण्यात स्वारस्य दाखविले. यावर्षी तरी हा प्रिमीयम कमी करावा, अशी आग्रही मागणी दि. १९ ऑक्टोबर रोजी कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांना त्यांच्या पन्हाळगड या शासकीय निवासस्थानी चंद्रकांत मोकल यांनी प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन सादर केले.

रेडिमेड किल्ल्यांना ग्राहकांची पसंती

। पाताळगंगा । वार्ताहर ।

दिवाळीत ग्रामीण भागामध्ये दगड, विटा, मातीपासून किल्ले तयार केले जातात. मात्र, शहरामध्ये किल्ले बनविण्यात अनेक समस्या निर्माण होत असल्यामुळे पीओपीपासून तयार केलेले रेडिमेड किल्ले विकत घेत असल्याने या किल्ल्यांना मागणी वाढली आहे.

ग्रामीण भागात जरी लहान मुले किल्ले बनवीत असली तरी शहरात हवी तेवढी जागा उपलब्ध नसल्याने अनेक जण रेडिमेड किल्ल्यांना पसंती देत आहेत. यामुळे या किल्ल्यांचे मूल्यही वाढलेले आहे. सध्या तयार असलेल्या किल्ल्यांना चांगली मागणी असून, त्याची किंमत शंभर रुपयांपासून हजार रुपयांपर्यंत आहे. हे किल्ले वजनाने हलके व आकर्षक दिसत असल्यामुळे प्रत्येक जण ते आवर्जून खरेदी करीत असल्याचे दृश्य पहावयास मिळत आहे.

'ती'च्या हाती 'आबोली'चे स्टेअरिंग

शेलू येथील दोन महिलांना रोटरीकडून रिक्षा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील शेलू येथे ग्रामीण रोटरी क्लबकडून तेथील दोन महिलांना आबोली रिक्षा घेऊन दिल्या आहेत. महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी देवनार रोटरी क्लबकडून महिलांसाठी रिक्षा घेऊन देण्यात आल्या आहेत. दरम्यान, आता शेलू स्थानकात महिला रिक्षाचालक पाहायला मिळणार असून, दोन महिलांची कुटुंबे रोटरीच्या माध्यमातून आर्थिक स्थिरता आणण्यासाठी प्रयत्नशील असणार आहेत.

रोटरी क्लब ऑफ देवनार यांच्या वतीने आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत महिला सक्षमीकरण करण्यासाठी रिक्षा ड्रायव्हिंगसाठी आवाहन करण्यात आले होते. त्यासाठी शेलू गावातील दोन महिलांनी नावे दिल्यानंतर त्यांचे पनवेल येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून लायसन्स आणि रिक्षा परमिट ही सर्व जबाबदारी रोटरीकडून पार पाडण्यात आली. त्यासाठी देवनार रोटरीच्या विद्या, अलका मुरली आणि पद्मा कपूर यांचे प्रयत्न सुरु होते. त्यांच्या पर्यटनातून आणि रोटरीच्या माध्यमातून शेलू गावातील मेघा रमेश भोईर आणि तनिष्का सिद्धेश हिरेमठ यांना रिक्षा देण्यात आल्या आहेत.

रोटरी ग्रामीण मंडळाचे कर्जत तालुका समन्वयक अर्जुन तरे आणि ग्रामीण रोटरीच्या खजिनदार रेखा हिरेमठ यांनी त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. आबोली रिक्षा देण्यात आलेल्या महिला रिक्षाचालक मेघा रमेश भोईर यांचे पती अपंग आहेत.

'आनंद शिधा'चा आनंद सुधागडात विरला

सर्वसामान्य जनतेतून नाराजीचा सूर

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

शिधा पात्र पत्रिकाधारकांना दिवाळीनिमित्त चार जिन्नसांचा समावेश असलेल्या अन्न संचाच्या वितरणाची घोषणा राज्य शासनाने केली आहे. मात्र, दिवाळीपूर्वी या शिधा जिन्नसांचा पुरवठा सुधागड तालुक्यात अद्याप पर्यंत कोणत्याही लाभार्थी घटकाला मिळाल्या नाहीत, त्यामुळे दिवाळी शिधा वाटपाचे सरकारकडून गाजर दाखविण्याच्या चर्चा सर्वत्र सुरु आहेत. राज्य सरकारने दिवाळीनिमित्त गोरगरीबांना शिधा देण्याचा निर्णय घेतला. चार शिधा जिन्नस यामध्ये १ किलो मैदा, १ किलो साखर, एक किलो पामतेल, एक किलो चनाडाळ

यांचा समावेश आहे. तालुक्यात १६९६९, इतके लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांपर्यंत दोन दिवसात पोहचणे शक्य नाही. त्यामुळे आनंद शिधा या योजनेचा तालुक्यात बोजवारा उडणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येते आहे.

सरकारने घोषणा केली खरी पण सण सुरु झाला तरी लोकांना अद्याप आनंद शिधा मिळाली नाही. लोक आशेवर आहेत, कुणाच्या घरात तेल आहे, तर साखर नाही, मीठ आहे तर भाकर नाही, अत्यंत वाइट स्थिति आहे, लवकरात लवकर आनंद शिधा मिळावी हिच अपेक्षा आहे.
-रमेश पवार
आदिवासी समाज नेते

पळस्पे येथे एसटी अपघातात १० जखमी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुका हद्दीतील महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे जवळ एसटी बसचा अपघात आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची ठाणे -सांगली बस क्रमांक MH 40 N 9164 हिला गंभीर अपघात होऊन प्रवाशांनी भरलेली बस रस्त्याच्या बाजूला पलटी झाली. कोन पुलावरून महामार्गावर जाणारा वळण घेत असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून खाली झाडांमध्ये पलटी झाली. दिवाळी सणासाठी चाकरमानी मुंबईहून गावी जाण्यासाठी या बसमधून प्रवास करीत होते. या बसमधून तब्बल ४६ प्रवासी प्रवास करीत होते. अपघातानंतर सर्व प्रवासी बसमध्येच अडकून पडले होते. महामार्ग पोलीस केंद्राला घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. बसच्या पाठीमागील काचा फोडून प्रवासी तसेच त्यांचे सामान बाहेर काढण्यात आले. या अपघातात ८ ते १० प्रवासी जखमी झाले आहेत. जखमी प्रवाश्यांना उपचारासाठी आयआरबीच्या रुग्णवाहिकेतून एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शिवीगाळ प्रकरणात एकावर कारवाई

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

पोलिसांसोबत धक्काबुक्की करून त्यांना शिवीगाळ करणाऱ्याला सानपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सानपाडा गावातील काही जणांनी दोन दिवसांपूर्वी पोलिस ठाण्यात दिलेल्या लेखी तक्रारीबाबत चौकशीसाठी पोलीस ठाण्यात गेले होते. या वेळी नितीन नाईक यांनी टपालामध्ये असलेल्या त्यांचा अर्ज कोणत्या अधिकाऱ्यांकडे चौकशीसाठी वर्ग केला आहे, याची माहिती घेऊन सांगतो, असे सांगितले. या वेळी नाईक यांनी अर्जदार मयूर मोरेला एकट्यालाच बारनिशी रूममध्ये येण्यास सांगितले असताना, अनुप म्हात्रे देखील त्यांच्यासोबत गेला. त्यानंतर नाईक यांच्याशी हुज्जत घालून शासकीय कामात अडथळा निर्माण करून धक्काबुक्की व शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदिवासी बांधवांना फराळाचे वाटप

। नागोठणे । वार्ताहर।

नागोठण्याजवळील कडसुरे गावातील विकास शिर्के व अरुण शिर्के बंधूंनी दीपावलीचे औचित्य साधुन कडसुरे ग्रामपंचायत हद्दीतील कागदावाडी, किल्लावाडी, पायरावाडी, झिमाडोह, नाईकवाडी, गायनावाडी या वाड्यांतील सुमारे २५० कुटुंबांना फराळाच्या जिन्नसा देण्यात आल्या. त्यात एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो बेसन, एक किलो मैदा, व एक किलो तेल देण्यात आले. या वाटप कार्यक्रमास रवींद्र शिर्के, प्रकाश शिर्के, बाळा पिंगळा, राई पारधी, देवकी पारधी, सुरेश पारधी, मधु पिंगळा, बबन मेंगाळ, रामा पिंगळा, भास्कर पारधी, चंद्रकांत मेंगाळ, भास्कर तुपकर, दिनेश कदम जितेंद्र शिर्के, नथुराम पाटेकर, तेजेश शिर्के, मंगेश शिंदे, दीपक शिर्के, यशवंत आप्पा शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

पावसामुळे खरेदीत हात आखडता

। पनवेल । वार्ताहर ।

परतीच्या पावसाचा मुक्काम वाढल्याने पनवेलमध्ये सायंकाळी दिवाळीच्या खरेदीवर काहीसे पाणी फेरले जात आहे. काही दिवसांपासून पावसाने धुडगूस घातला आहे. पावसामुळे खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची संख्या रोडावली आहे. फटाके विक्रेत्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच पावसामुळे हातातोंडाची आलेले भातपीकही धोक्यात आले आहे. त्यामुळे बळिराजा चिंतेत आहे. व्यापारी व दुकानदारांनी दिवाळीसाठी लाखो रुपयांचा माल भरून ठेवला आहे. परंतु ग्राहक नसल्याने ऐन दिवाळीत वस्तूंना उठाव नाही. त्यामुळे व्यावसायिक पुरते हवालदिल झाले आहेत. कापणीला आलेला भात शेतातच आहे. सुगीच्या दिवसांना अजून सुरुवात झालेली नाही. त्यात परतीच्या पावसाने भाताचे पुरते नुकसान केले आहे. त्यामुळे हाती पैसा नसल्याने शेतकरी काहीसा धास्तावला आहे.

आकाशकंदील, इलेक्ट्रिक वस्तूंपासून, मिठाई, फराळ सर्वच वस्तूंच्या किमती १० ते २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. पावसामुळे वस्तू प्रदर्शनासाठी दुकानाबाहेरही ठेवता येत नाहीत. त्यामुळे विद्युत रोषणाई, आकाशकंदील कुठे लावावे, रांगोळी कुठे काढावी, फटाके कुठे फोडावेत हे प्रश्न अनेकांना पडला आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळवण्यात येते की, आमचे अशिल यांने मौजे-ढाक ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे मालक श्री.मोहन श्रीपद राव यांच्याकडून खरेदीखताने कायमची विकत घेण्याचे ठरविले असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

सर्वे नं.	क्षेत्र	आकार (रू.पै.)
२४	०.६६.८०	१.०६

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल अशिल व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाणः कर्जत
दि.२३/१०/२०२२

वकील
ॲड.सचिन संजय सुर्वे
पत्ता-नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१
मो.नं.९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १.श्रीमती अस्मिता मिलींद केतकर, २.श्री.महेंद्र अरविंद वैद्य, ३श्री.राहुल रविंद्र वैद्य, ४.श्रीमती रूपाली रविंद्र वैद्य ५ श्रीमती उषा वसंत शिंत्रे, ६ श्रीमती गिरिजा भालचंद्र कान्हेरे, ७ श्रीमती वंदना वसंत केळकर, ८ श्री.राजेश यशवंत वैद्य, ९ श्रीमती योगिनी यशवंत वैद्य, १०.श्रीमती मेघना माधव वैद्य ११.श्रीमती मिताली उदय दामले, १२ श्री.वैभव माधव वैद्य यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असता तरी खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यास निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे रेवदंडा तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड

मौजे	ग.नं.	एकूण क्षेत्र	आकार (रू.पै.)	प्रकार
रेवदंडा ता अलिबाग	४२/१/१४ /१०	एकूण क्षेत्र०.००८० हे.आर.चौ.मी.	०.३३	बागायत
रेवदंडा ता.अलिबाग	४२/१/९	एकूण क्षेत्र ०-०७-५९ आर.चौ.मी	७५.९०	बिनशेती
रेवदंडा ता.अलिबाग	२४०	एकूण क्षेत्र .०-००-१६ आर.चौ.मी.	१.६०	बिनशेती
रेवदंडा ता.अलिबाग	२४१	एकूण क्षेत्र ०-००-०८	८.००	बिनशेती

या मिळकती व त्यामधील ग्रामपंचायत रेवदंडा हद्दीतील घर मिळकत क्र. ५४१, ५४२, ५४० या घर मिळकती.

दिनांक २१/१०/२०२२
अशिलांची सही

ॲड.समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग,मोरेश्वर अर्पाटमेंट,
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा.९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यानी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालक १) श्री.सुनिल बिहारीलाल फाडीया, २) श्रीम.उशा सुनिल फाडीया यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे - वारे , ता- कर्जत, जि- रायगड, येथील जमिन मिळकत,

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे.आर. पॉ	आकार रु. पै
१००	२	०.१६.०० पो.ख. ०.०५.००	०.१०
१००	३	०.७८.०० पो.ख. ०.१६.००	०.४५
१००	४ / अ	१.९३.४० पो.ख. ०.५३.००	१.००
१००	७	०.२९पो.ख. ०.८.००	०.१६
१००	४ / ब	०.४५.०० पो.ख. ०.१२.००	०.२५
१००	८ / क	१.७४.००पो.ख. ०.५६.००	०.९४

सदर जमिन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकारी असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंभुत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, मृत्यूंपत्राकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लीन, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकार बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.२२/१०/२२ खरेदीदारातर्फे वकील

ॲड.अश्विनी लक्ष्मण लोहकरे
९०६७१०६९९९/९७६७४२९२६३

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.संभाजी बारकु कराळे व सौ.उषा संभाजी कराळे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री.मोत्या उर्फ मॅथ्यू फ्रान्सीस मिनेजीस यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णनः- मौजे बांधिवली, ता.कर्जत जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार(रू.पै.)
१२२	२/अ	०-०९-३०	०-९४

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण,दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि.२३/१०/२०२२

ॲड.नरेश रामदास आहीर
पत्ता-शॉप नं.१२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत जि.रायगड
मो.९३२५०६००३७.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टातमध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल श्री.तुषार काशिनाथ भंगाळे रा.फ्लॅट नं.९०१, टॉवर क्र.०४, भुखंड क्र.ए-२४ ई, न्यु सातारा को ऑप हाऊसिंग सो., सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे आशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७(सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट
मौजे खांडस, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
श्री.महेशकुमार चमनलाल	५५	३	०-६७-०	०-५६

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता- मु.पो.कशेळे
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाव्यान्या समोर,
ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
दिनांक- २३/१०/२०२२
मो.नं. ९१५८२७७७२८

Change in Name

My old name was misba karan kodalkar and Ihave change this name to Misba Rafique patel from today onwards. I will be recognize by my new name i.e Misba Rafique patel as per registration No. M-2219839
Address-Shilgaon, Shilphata, Khopoli
Tal- khalapur, dist-Raigad 410203

नावात बदल

माझे जुने नाव मिसबा करण कोंडीलकर असे होते आणि आजपासून ते नाव बदलुन मिसबा रफीक पटेल असे केले आहे.
नोंदणी क्रमांक - M-2219839
पत्ता- शिळगाव, शिळफाटा, खोपोली
ता.खालापूर, जि.रायगड- ४१०२०३.

नमुना क्र. ७५ सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग रायगड

चौकशीची जाहिर नोटीस जाक्र/न्याय शाख/१५४३/२०२२

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग याचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि.रायगड

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक :- ४१६/२०२२ दिनांक : २१/१०/२०२२

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमाक :- LIONS CLUB OF SHREEBAG CENTENNIAL, ALIBAG TAL-ALIBAG जि.रायगड

....बाबत

Shrimti. Kala Harishchandra patil ....अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्दयांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम-२०००/-रूपये
(ब)स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही. असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१/१०/२०२२ रोजी दिली.

सही/-
(प्र.अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बेकरे, ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक कोनासानी कोटीचन्ना रेड्डी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नं.	हिस्सा नं	क्षेत्रफळ हे.आर.	आकार रू.पै.
२९	३	०-३४-९०	५-६९
३०	३क	०-४६-१०	८-१९

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.२३/१०/२०२२

ॲड.प्रविण पुंडलिक कराळे,
पत्ता-ओमकार अपा.मु.डिकसळ,
पो.कोषाणे, ता.कर्जत जि.रायगड
मो.९६०७५५६३१५.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली केलेल्या शेतकरी/कुळ जमिन मालक यांच्या मालकीची व प्रत्यक्षात त्यांच्या ताबे कब्जातील असणारी १)कै.लक्ष्मण गोटीराम चोरघा (मयत) यांचे कायदेशीर वारस १/१ कै. लक्ष्मीबाई लक्ष्मण चोरघा पत्नी (मयत) १/२ श्री बाबुराव लक्ष्मण चोरघा वारस मुलगा रा.विठठल मंदिर जवळ, बेलवली, पो.चिखले, रायगड.४१०२२१. २)श्री.रामचंद्र गोटीराम चोरघा रा.बेलवली, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२१, ३)श्रीमती गणीबाई किसन चावळे उर्फ राधाबाई किसन पाटील रा.किसन पाटील, घर क्र.२३० क, बीएआरसी कॉलनी, चिखले, रायगड ४१०२२१, ४)श्रीमती शेवंतीबाई उर्फ शेवंती बाळाराम शेळके, रा हनुमान मंदिर जवळ, पो.चिखले,पालीखुर्द, चौक, रायगड ४१०२०६, ५)श्रीमती भिमाबाई तुकाराम पाटील उर्फ जिजाबाई तुकाराम पाटील रा.शिवकर, राम.मंदिर, चिखले, रायगड ४१०२२१ ६)श्री.मधुकर हिरू चोरघे रा.बेलवली, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२१ ७)श्रीमती.नंदा सुभाष पाटील उर्फ नंदा हिरू चोरघे रा.विठठल मंदिर जवळ, बेलवली, पो.चिखले रायगड ४१०२२१,८) श्री.आत्माराम हिरू चोरघे रा.घर क्र.३५५, मु.बेलवली, पो.चिखले, पुंडलिक मंदिराच्या जवळ, पनवेल बेलवली, चिखले, रायगड ४१०२२१, यांच्या मालकीचे सर्व्हे क्र./गट क्र.१३४/२ब, भोगवटदार वर्ग२, लागवडी योग्य क्षेत्र ०-२७-८०, पो.ख.०-००-५० आकार ४.०० व सर्व्हे क्र./गट क्र.१३१/३, भोगवटदार वर्ग .२, लागवडी योग्य क्षेत्र ०-२६-३०, पो.ख.०-०२-०० आकार ५.०६ म्हणजेच एकूण ०-५६-६० (या क्षेत्रासाठी संपुर्ण मालकी हक्क असणारी) ही जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणेः-

अ. नं.	शेतकऱ्याचे नाव	गावाचे नाव	सर्व्हे क्र./ गट क्र.	क्षेत्र हे.आर.प्र.
१	कै.लक्ष्मण गोटीराम चोरघा (मयत) यांचे कायदेशीर वारस	मौजे लोणीवली, ता.पनवेल जि.रायगड	१३४/२ब	०-२७-८० पो.ख.०-००-५०
१/१	कै.लक्ष्मीबाई लक्ष्मण चोरघा पत्नी (मयत)			०-२८-३० .....
१/२	श्री.बाबुराव लक्ष्मण चोरघा मुलगा		१३१/३	०-२६-३०
२	श्री.रामचंद्र गोटीराम चोरघा			पो.ख.०-०२-००
३	श्रीमती.गणीबाई किसन चावळे उर्फ राधाबाई किसन पाटील			०-२८-३०
४	श्रीमती.शेवंतीबाई उर्फ शेवंती बाळाराम शेळके			
५	श्रीमती.भिमाबाई तुकाराम पाटील उर्फ जिजाबाई तुकाराम पाटील			
६	श्री.मधुकर हिरू चोरघे			
७	श्रीमती.नंदा सुभाष पाटील उर्फ नंदा हिरू चोरघे			
८	श्री.आत्माराम हिरू चोरघे			
			एकूण क्षेत्र	०-५६-६०

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही, विक्री, गहाण,दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे आलेल्या खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

दिनांकः /१०/२०२२

ॲड.नरेश चांगा पाटील
पत्ता-राहणार पेंधर, पो.नावडे,
ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८४५१०६१८१८

धारावीत शेकापक्षाचा मोर्चा

। मुंबई । प्रतिनिधी ।

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशनवर अंत्योदय अन्न योजनेतंर्गत दिवाळी निम्मित्त एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चणा डाळ व एक लीटर पामतेल या चार जिन्नसांचा समावेश असलेला संच १०० रुपयात उपलब्ध होणार होता. परंतु हा संच अजूनपर्यंत न मिळाल्याने धारावी शिधावाटप कार्यालयावर शेतकरी कामगार पक्षातर्फे मोर्चा, गुरुवार (दि.२०) रोजी मोर्चा काढण्यात आला होता.

आनंदाचा शिधा तातडीने देण्याची मागणी

धारावीसह मुंबई येथील कोणत्याही शिधावाटप दुकानात अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. सणासुदीचे दिवस तोंडावर असताना लोक शासन निर्णय अंलबजावणीच्या प्रतीक्षेत आहेत. या किटचे वितरण त्वरित सुरू करण्यात यावे आणि या घोषणेअंतर्गत विशेष सवलत दिलेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांप्रमाणे, धारावी येथील दारिद्र्य रेषेवरील शिधापत्रिकाधारकांना देखील सरसकट या योजनेचे लाभार्थी बनवण्यात यावे, या मागणीकरिता हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी शिधावाटप अधिकाऱ्यांनी येत्या चार दिवसात या जिन्नसांचे वितरण होईल, असे आश्वासन दिले.

यावेळी मुंबई पुरोगामी विद्यार्थी संघटना अध्यक्ष साम्या कोरडे, शेकाप धारावी विधानसभा चिटणीस असगर हुसैन, अख्तर हुसैन रंगरेज, सिराज शेख, इरफान अहमद यांचा समावेश होता.

पनवेलमध्ये डिझेल चोरांचा धुमाकूळ

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल शहरात वाहनातील डिझेल चोरीची समस्या मोठी गंभीर बनली आहे. रात्रीच्यावेळेस रस्त्याकडेला वाहन उभे करुन निवांत घरी झोपण्यास जाणाऱ्या चालकांच्या वाहनातील चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तीनशे लीटर डिझेल चोरले आहे. या चोऱ्या सोमवारी (ता.१७) आणि मंगळवारी (ता.१८) रात्री घडल्या आहेत. पोलिसांनी गुरुवारी या प्रकरणी अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

पनवेलप्रमाणे कळंबोली वसाहतीमध्ये अशाच प्रकारे गेल्या आठवड्यात दिडशे लिटर डिझेल पोकलेन मशीनमधून चोरीस गेले होते. डिझेल चोरांची टोळी मध्यरात्रीपासून ते पहाटेपर्यंत शहरातील रस्त्यांवर फिरत असल्याने पोलिसांसमोर डिझेल चोरांना जेरबंद करणे हे आव्हान बनले आहे. कळंबोली परिसरातील घटना (१३) ऑक्टोबरला पहाटेला मध्यरात्री साडेतीन वाजता घडली. किशोर खानावकर यांच्या पोकलेन मशीनचे काम सेक्टर ६ ई येथे सुरु असल्याने त्यांच्या मालकीची मशीन तेथे उभी होती. चोरट्यांनी त्यांच्या पोकलेनमधून दिडशे लीटर डिझेल आणि दोन बॅटऱ्या चोरल्या. तर पनवेल तालुक्यामधील पाडेघर गावासमोर ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्टसमोर प्रमोद धावरे यांनी त्यांच्या बसचे चाक (टायर) फुटल्याने बस उभी केली होती. रात्री एक वाजल्यानंतर चोरट्यांनी प्रमोद यांनी उभ्या केलेल्या बसच्या डिझेल टाकीतून २०० लिटर डिझेल चोरले. तर तिसऱ्या घटनेत इम्रान खान यांनी त्यांच्याजवळील रुग्णवाहिका मंगळवारी (ता.१८) रात्री उपजिल्हा रुग्णालयाच्या समोर उभी केली होती. त्यामधून शंभर लीटर डिझेल चोरी केले होते.

महत्त्वाचे

मानवता फाऊंडेशनच्या सचिवपदी कुमठेकर

। पनवेल । वार्ताहर ।

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या मानवता फाउंडेशनच्या राष्ट्रीय सचिवपदी समाजसेविका अजिता कुमठेकर यांची नियुक्ती अध्यक्ष संजय पवार यांनी केली. यावेळी अध्यक्ष संजय पवार, महिला अध्यक्षा स्वाती पांचाल आदी उपस्थित होत्या.

घोणस जातीच्या सापाला जीवदान

। मुरूड । प्रतिनिधी ।

मुरूड शहरातील भंडारवाडा बाजारपेठ येथील प्रशांत कासेकर यांच्या घराच्या मागील वाडीत विषारी जातीच्या ४.५ फुटी लांबीच्या घोणस सापाला सर्प मित्र संदीप घरत यांनी मोठ्या शिताफीने पकडून या घोणसला वनखात्याच्या सहाय्याने जंगलात जाऊन सोडून दिले.

मत्स्यव्यावसायिक सोसायटीची स्थापना

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील मच्छिमार कोळी बांधवांच्या विविध अडचणी व समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून मोरा मत्स्य व्यावसायिक सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. या मच्छिमारसोसायटीच्या चेअरमनपदी राकेश कोळी व्हाईस चेअरमनपदी कल्पना मोरेकर तर सेक्रेटरीपदी नारायण कोळी यांची निवड करण्यात आली आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेचे रविंद्र पाटील यांनी सर्व सभासदांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

शाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ

। उरण । वार्ताहर ।

रा.जि.प. प्राथमिक शाळा पाले येथील इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांतर्फे पूनाडेवाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ, शैक्षणिक साहित्य व आकाश कंदील यांचे गुरुवार (दि. २०) रोजी वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच भावनिक व सामाजिक विकास व्हावा, ही भावना मुलांमध्ये रुजावी या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी दर्शना म्हात्रे, समाधान म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, स्वप्नाली म्हात्रे, मिताली म्हात्रे, विश्रांती म्हात्रे, पालक, उर्मिला म्हात्रे, सारडे विकास मंचचे नागेंद्र म्हात्रे, पाले शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर, उपशिक्षिका, पुष्पलता म्हात्रे व शाळेतील विद्यार्थी, पूनाडे वाडी शाळा व्यवस्थापन अध्यक्ष व शिक्षक उपस्थित होते. शेवटी उपेंद्र ठाकूर यांनी आभार मानले.

दीपावली सण साजरा करताना नागरिकांनी जागरुक राहावे

। तळा । वार्ताहर ।

तळा तालुक्यातील नागरिकांनी दीपावली सण साजरा करताना जागरूक राहावे असे आवाहन तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी केले आहे. यासाठी त्यांनी नागरिकांना बाजारात खरेदीसाठी जाताना महिलांनी अंगावरील सोने मौल्यवान वस्तु झाकुन ठेवावे. सोनसाखळी चोरांपासुन सावध रहावे. एटीएम व बँकेतुन पैसे काढल्यानंतर पैसे सुरक्षित ठेवावे असे आवाहन त्यानी केले.

तिवरे उपसरपंचपदी संतोष भासे बिनविरोध

। कर्जत । प्रतिनिधी ।

तिवरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिंदे गटाचे संतोष रघुनाथ भासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच चित्रा भासे यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते.

सरपंच चंद्राबाई पुंडलिक वळवे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामसेवक सुभाष पवार, सदस्य संजय तिखंडे, चित्रा भासे, अपर्णा दगडे, उज्वला ठाकरे, जनाबाई पवार, सुजाता दाभणे, सुश्मिता जाधव, अनिल पवार, गुरुनाथ दगडे, प्रमोद ठाकरे, स्वाती घरत आदी उपस्थित होते.

भासे यांचे शिवराम बदे, नगरसेवक संकेत भासे, वरई ग्रामपंचायतीचे सरपंच सुरेश फराट, अरुण देशमुख, भालचंद्र घोडविंदे, जितेंद्र भासे आदीने अभिनंदन केले आहे.

किसान समृद्धी केंद्राचे उदघाटन

। चौल । वार्ताहर ।

रसायन व खत मंत्रालय, भारत सरकार तसेच राष्ट्रीय केमीकल्स अँड फर्टिलीझर्स यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्राचे उदघाटन १७ आक्टोबर रोजी चौल येथे झाले.

याप्रसंगी जिल्हा परिषदांचे कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरखुटे, दत्तात्रेय काळभोर कृषी उपसंचालक, प्रदीप बैनाडे तालुका कृषी अधिकारी अलिबाग हे उपस्थित होते. अमर घडवे यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. तर हेमंत गुरसाळे यांनी आरसीएफच्या उत्पादके याबाबत माहिती सांगितली

'हरिओम'ची टीम राज ठाकरे यांच्या भेटीला

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

हरिओम चित्रपटासारखा ऐतिहासिक चित्रपट व निर्माते तयार होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. ठाकरे यांनी हरिओम टीमचे निर्माते, अभिनेते व सह कलाकार यांनी भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

शिवप्रेमाने प्रेरित झालेल्या आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या नव्या युगातील मावळ्यांची कथा असलेल्या हरिओम चित्रपटाच प्रदर्शित झाला,याबद्दल ठाकरे यांनी समाधान व्यक्त करीत टीमला आशीर्वाद दिले. नरवीर तानाजी मालुसरे यांची शौर्य व कर्मभूमी असलेल्या उंबरठ येथील पवित्र व ऐतिहासिक भूमीत अभिनेते हरिओम घाडगे व गौरव कदम यांनी ट्रेलर प्रदर्शित करून हा चित्रपट नरवीर तानाजी मालुसरे व सूर्याजी मालुसरे यांना समर्पित करण्यात आला. या चित्रपटाला जनतेतून उत्स्फूर्त प्रेम मिळत आहे. यावेळी मुख्य अभिनेता व निर्माता हरिओम घाडगे, दिग्दर्शक आशिष नेवालकर, मनोज येरूनकर व हरिओम चित्रपटातील कलाकार तसेच चित्रपट निर्माते फैजल पोपेरे हजर होते.

साप्ताहिक राशिभविष्य : दि. २३ ते २९ ऑक्टोबर २०२२

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

घाईत निर्णय घेऊ नका

मेष : हा साप्ताह मेषराशीधारकांना उसताहपूर्ण असणार आहे, नोकरी धंद्यासाठी केलेला प्रवास यशस्वी होणार आहे. आपण केलेला लहान व्यवहार ही फायदा देणारा ठरणार आहे, व्यवसायात एखादे लक्ष प्राप्त होण्याचा संभव आहे, महत्वाच्या कामासाठी आपली निवड होऊन आपल्यावर जबाबदारी सोपवली जाणार आहे आपण मेहनतीने ती यशस्वी करू शकाल प्रॉपर्टी बाबत व्यवहार होण्याचा संभव आहे योग्य तो निर्णय घेण्यास हरकत नाही, प्रेम विवाहात बदल करण्यास बोलणी होऊ शकतात आपण ताणून धरू नका नाहीतर आपला तोटा होऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेला निर्णय चुकीचा असू शकतो. मनोरंजनासाठी जास्त खर्च करू नका .विवाहिताना घराच्या जबाबदाऱ्या पार पडताना नाकी नऊ येतील. इतर दिवस चिंतेत टाकनारे नसले तरी आमवशा मात्र घरातील व्यक्तींसाठी काळजी वाढवणारी ठरणार आहे. **महिलांना-** आपल्या पूर्वजांना स्मरण करून तो दिवस त्यांच्यासाठी देणे आपल्यासाठी हितकारक असेल. पूर्वजांसाठी अंमवसेस पितृपीडा स्तोत्र वाचने हितकारक आहे. **शुभदिनांक-** २३,२४

प्रलोभनांपासून दूर राहा

सिंह : सिंहराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रलोभने टाळा. आठवड्याच्या शेवटी महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. प्रवास टाळावा **महिलांना**- बाहेर पडताना तब्बेतीची पूर्ण काळजी घेणे आवश्यक आहे, थंड पदार्थ अजिबात घेऊ नये त्या पासून लांब राहणे उत्तम ठरेल. संततीकडून खुश खबर मिळणार आहे, लांब फिरण्यास जाण्याचे नियोजन केल जाईल तीर्थयात्रा करण्यास हरकत नाही. **शुभदिनांक**- २६,२८

वरिष्ठांशी जुळवून घ्या

धनु : धनुराशीसाठी प्रलोभन समोर आले तरीही नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. व्यवसायात लाभ घेऊ शकतील, प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, मसालेदार पदार्थ खाण्याचे व चहा टाळा. आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय व्यक्तीनचे राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल,निर्णय मात्र विचारपूर्वक घ्यावा. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. शनिदेव किंवा मारुतीला तेल वाहा. **महिलांना**- आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. संतातीच्या प्रकृतीबाबत आपण अधिक दक्ष राहा, डॉक्टरचा सल्ला घ्या. **शुभ दिनांक**- २४,२८,

खर्चावर नियंत्रण ठेवा

वृषभ : हा साप्ताह वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील, आपला राग एकदम बाहेर पडणारा असतो, त्या वाफ जाई पर्यन्त थांबणे हितकारक असेल त्यासाठी वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढउतार संभवतात. तरीही हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. त्यामुळे आपले काम थांबवू नका, नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. ५० पुढील व्यक्तिनि प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. एका बाजूने आपल्याला जोडीदाराची उत्तम साथ मिळणार आहे. कलाक्षेत्राला उत्तम हा कालावधी उत्तम असून, पितरांनचे स्मरण करणे म्हत्वाचे आहे. महिलांना- महिलांना त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणारा कालावधी आहे, एखादा सत्कार ही होण्याचा संभव आहे. प्रवासाचे योग संभवतात, आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे म्हणजे

धार्मिक कार्यात सहभाग घ्या

कन्या : कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. सरकारी कर्मचारिवर्गाने नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बढती व बदली बाबत विचार होऊन नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाबतीत तज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय व्यवहार करू नये. विशेषतः मुलांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. **महिलांना**- धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभदिनांक**- २७,२९

नियोजित कामे पार पाडतील

मकर : हा साप्ताह ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागल्यास व त्याप्रमाणे कृती केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. कामकाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना शांतपणे व संयमाने हाताळल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य होऊ शकतील. प्रत्येक गोष्टींचा आस्वाद घेताना त्याचा अतिरेक होणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. नोकरदारांना व व्यावसायिक क्षेत्राला चांगला काळ राहील. हितशत्रूंची चिंता करण्याचे कारण नाही, ते गप्प बसतील. आपण आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. साहसी कृत्ये कटाक्षाने टाळावीत. विरोधकांच्या हालचालींवर कडक नजर ठेवावी, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. **महिलांना**- जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोगयाबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. **शुभ दिनांक**- २७,२९

श्रमाचा योग्य परतावा मिळेल

मिथुन : मिथुनराशीसाठी त्याने घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. जोडीदाराची योग्य साथ मिळणार असल्याने एखादे मोठे काम करण्यास हरकत नाही, आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाहइच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. **महिलांना-** आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. थोड हट्टीपणा बाजूला ठेऊन जोडीदाराच्या मनाप्रमाणे वागा, घरातील वातावरण बदलून जाईल एखादे शुभ कार्य करण्याबाबत ठरवले जाईल. **शुभदिनांक-** २८, २९

बोलण्यावर नियंत्रण ठेवा

तूळ : तुलराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता एकूण वातावरण चांगले राहिल्याने आपणास आनंद घेता येईल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास गैरसमजापासून दूर राहू शकाल. गोड बोलून आपला कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारणे योग्य राहील. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते कसोशीने पाळा. आपण कार्यक्षेत्राबाबत दुसऱ्यांवर विश्वास न ठेवता स्वतः जातीने लक्ष घातल्यास आपण आपले उद्दिष्ट गाठू शकाल. कामाचा उत्साह वाढला तरी आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मित्रमंडळी व आप्तेष्टांच्या गाठीभेटी होतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामांना मार्गी लावण्याचा प्रयत्न करा. घरगुती वातावरनात गोडवा येऊ शकेल, बाहेर फिरताना आपल्या किमिती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. माशांना खाण्यास देणे भाग्यकारक आहे. **महिलांना**- मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **शुभदिनांक**- २४,२५

कामाची दगदग वाढेल

कुंभ : या सप्ताहातील प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे राहील आठवड्याच्या शेवटी स्थिति सामान्य होणार आहे, तो पर्यन्त दम धरणे क्रम प्राप्त राहील, घराबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात कोर्ट कचेरी ही होऊ शकते. आपण कितीही काम केलेत तरी आपल्या अधिकारी वर्गाचे समाधान होणार नाही घरात ही अशीच स्थिती राहील, कामात दगदग वाढणार आहे. स्थावर मालमत्तेची कामे करताना विचारपूर्वक करावीत. हातचे सोडून पळत्याच्या पाठी जाऊ नका, कामकाज नसलेल्याना अचानक काम हाती येणार आहे त्यामुळे हाती पैसा खेळू शकेल. कमी पैसे असले तरी हातातील संधि सोडू नका, आपल्या जिवलगा सोबत वेळ घालवण्याची संधी उपलब्ध होईल, योग्य त्या रीतीने त्याचा फायदा घ्या. जुन्या समस्या व चिंता मिटणार आहेत. **महिलांना** - घरात एखादे मंगल कार्य होणार आहे त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका त्रास होऊ शकतो. **शुभ दिनांक** -२३,२५

कौटुंबिक वादविवाद टाळा

कर्क : या सप्ताहात कर्कराशीधारकास या सप्ताहात ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल विवाहइच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्चापासून लांब रहा बचती बाबत सजग राहा जोडीदाराची साथ मिळेल. पदवीधारकाने अभ्यास सुरू करावा प्रवास संभवतो. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. **महिलांना-** विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्याव लागेल घरात काही किमती वस्तूची खरेदी कराल शुभ मनोरंजनामध्ये जागरण टाळणे हितावह आहे. **शुभदिनांक-**२३,२४

संयम व जिद्द ठेवा

वृश्चिक : :- वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चांचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना बढती मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. अंमवशा असताना घरात वाद घालू नका. **महिलांना**- हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यानची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. **शुभ दिनांक** - २३,२६

खर्चात वाढ होईल

मीन : हा साप्ताहात मीन राशीसाठी खर्चात वाढ होणारा जाणार आहे, व्यापार करणाऱ्या व्यक्तींना साह्य न मिळाल्यामुळे त्रास सहन करावा लागेल, जो चिकाटी धरून राहील त्याचे नशीब पळफळणार आहे. कोणतीही कृती आताताईपणे न करता विचार पूर्वक करा या आठवड्यात आपल्यावर जबाबदऱ्या येणार आहेत या जबाबादऱ्या पार पाडताना आपला कस लागणार आहे, त्यामुळे आपल्याला झेपतील इतकीच जबाबदारी स्वीकारा. आपल्यात असणारी सकारात्मक बाजू आपल्याला अडचणी सोडवण्यास मदत करतील, सरकारी क्षेत्रात असणाऱ्या व्यक्तिना मान सन्मान मिळणार आहे, कुटुंबात वाद विवादाचे कारण बनू नका. देव दर्शनाला जाण्याचा बेत आखला असेल तर ही इच्छा आता फलद्रूप होणार आहे, आठडवड्याच्या शेवटी राजकारणात आपल्याला मानसन्मान मिळणार आहे, व्यापारात शेवटी शेवटी फायदा होणार आहे, **महिलांना-** महिलावर्गाचा वेळ दुसऱ्यांची भांडणे सोडवण्यात जाणार आहे, मात्र अशावेळी सत्याची बाजू घ्या त्यामुळे यश प्राप्त होईल, कोणीतरी आपली कानउघडणी करण्याची गरज निर्माण होईल, तुमची ताकद तुमच्या विचारातआहे. **शुभदिनांक**- २४,२५

मोहोर

चिंतन

प्रसाद केरकर
९८६७७२१११०

निर्बंधमुक्त दिवाळी..मात्र..

कोरोनाच्या लाटेतून बाहेर आल्यावर सर्व निर्बंध उठल्यावरीची यंदाची ही पहिली दिवाळी. गेली दोन वर्षे सर्वांना सण साजरे करता आले नव्हते. आता मात्र सर्व निर्बंध उठले असले तरी सावधानता बाळगावी लागणार आहे. कारण दिवाळीच्या फटाक्यात फोडलेल्या धुरातून अनेक श्वसनाचे रोग व कोरोना वाढण्याची भिती व्यक्त झाली आहे. त्यामुले दिवाळीच नव्हे तर इतर कोणतेही सण आपल्याला भविष्यात सर्व सावधानगिरी बाळगत केले पाहिजेत. कोरोनावर आपण बाजी मिळविली कारण आपल्याकडे लस उपलब्ध झाली, आता आपण लसीचे सर्व जनतेला दोन डोस जवळपास दिले आहेत. तिसरा डोसही अनेकांना दिला गेला आहे. परंतु या डोस घेण्याचे प्रमाण मर्यादीत आहे.

यंदा आपण निर्बंधमुक्त दिवाळी साजरी करणार असलो तरीही यंदाच्या महागाईमुळे अनेक मर्यादा आल्या आहेत. सर्वांच्या खिशाला अगोदरच मोठी कात्री लागली आहे. जवळजवळ सर्वच जीवनावश्यक वस्तूंनी किंमतीचे नवनवीन उच्चांक केले आहेत. त्यातच दिवाळीच्या तोंडावर साखर, तूप यांच्या किंमती कडाडल्या आहेत. त्यामुळे दिवाळी यंदा सर्वांसाठी महागाईचा चटका देणारी ठरली आहे. दिवाळी म्हणजे आशा, आकांक्षा वृध्दींगत करणारा दिव्यांचा, प्रकाशाचा सण. आपल्या मनात असलेले दुख:, निराशा क्षणभर विसरुन आपण हा सण साजरा करतो. यामागे भावना असते ती आगामी चांगल्या भविष्यवेधी कालखंडाची, उष:कालाची. दिवाळीचा सण साजरा करीत असताना आपल्या मनात नेहमी आनंदच असतो. शेतकरी खुशीत असतो कारण या काळातच पीक चांगलेच बहरुन आलेले असते. यंदा मात्र पुण्यापासून अनेक भागात जामाऱ्या पावसाने जोरदार वृष्टी करुन ओला दुष्काळासारखी स्थिती निर्माण केली आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना काही दिलासा देण्याची गरज आहे, परंतु सरकारने अजूनही फारसे काही ठोस आश्वसन दिलेले नाही. कर्मचारी व कामगारांना पूर्वी दिवाळीपूर्वी हमखास बोनस दिला जाईल, मात्र आता कामगार चळवळ क्षीण होत चाललल्यावर बोनसचे आकडे कुठेच जाहीर होताना दिसत नाहीत. यंदा तर शेअर बाजारात जबरदस्त मंदी आहे. दिवाळीच्या तोंडावर थोडीफार हलकीशी तेजी आल्यासारखी दिसत आहे, परंतु जागतिक पातळीवर मंदीचे ढग जमा झालेले असताना शेअर बाजारात फारशी तेजी येण्याची शक्यता कमीच आहे. कोरोनानंतर अर्थव्यवस्था सावरु लागल्यावर आता पुन्हा एकदा मंदीचे वातावरण निर्माण झाल्याने जगात निराशेचे व सावधानगिरीचे वातावरण आहे. केंद्रात गेल्या सात वर्षात मोदी सरकार आल्यापासून जनतेच्या जीवनात फारसा काही बदल झालेला नाही. अच्छे दिन येण्याची शक्यता तर दूरच परंतु लोकांना पूर्वीचेच दिवस बरे होते असे वाटू लागले आहे. उलट रोजचे जीवन जास्तच कष्टप्रद होत आहे. महागाईचा आलेख तर सतत चढताच आहे. जागतिक पातळीवर खनिज तेलाचे दर फारसे वाढलेले नसतानाही पेट्रोल डिझेलने किंमतीचा नवनवीन उच्चांक गाठू लागला आहे. ज्यावेळी सध्याचे सत्ताधारी विरोधात होते त्यावेळी हेच पेट्रोल-डिझेल ५० रुपयांच्या पार गेल्यावर आंदोलन करीत होते. आता मात्र सत्तेत आल्यावर हेच आंदोलक या वाढीचे निर्लज्जपणे समर्थन करीत आहेत. महाराष्ट्र राज्य आपण पुरोगामी म्हणवतो मात्र राजधानीच्या शहरापासून केवळ शंभर किमी अंतरावर कुपोषणाने बालके मृत्यूमुखी पडताना दिसतात. अनेकांचे उघड्यावर पडलेले संसार जिथे फोडणीला तेल नाही, चूल पेटवायला रॉकेल नाही, तिथे दिव्यात घालायला तेल येणार तरी कुठून! संसाराची विस्कटलेली घडी बसवायला अजून किती दिवस किंवा वर्षे जातील कुणास ठाऊक! आज जे दिवाळी आनंदाने साजरी करीत आहेत त्यांनी, ज्यांना दिवाळीचा आनंद उपभोगता येत नाही त्यांची आठवण जरुर केली पाहिजे. अजूनही पंच्याहत्तर वर्षाच्या स्वातंत्र्यानंतरही आपल्याकडे सर्व वाड्यांवस्त्यांवर वीज पोहोचलेली नाही. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येने त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले. आपल्या पश्चात कुटुंबाचे काय हाल होतील याचा जराही विचार न करता धडाधड मृत्यूला कवटाळणाऱ्या त्या शेतकऱ्यांच्या घरात या दिवाळीत किती पणत्या पेटतील? आणि पेटल्या तरी त्यांना लगेचच लक्ष्मी प्रसन्न होईल? कशी असेल त्यांच्या घरची दिवाळी? कोरोनामुळे गेल्या दीड-दोन वर्षात अनेक मुले पोरकी झाली आहेत, अनेक स्त्रिया विधवा झाल्या आहेत, कुपोषणाचे प्रमाण वाढले आहे. त्यांच्यासाठी ही दिवाळी म्हणजे अंधकारमयच ठरली आहे. दिवाळीच्या स्वागतासाठी आकाशाच्या दिशेने दिवा सोडताना आपण तो नेमका कोणासाठी लावत आहोत? याची जाणीव आपल्याला राहिली आहे का? जिथे आधीच प्रकाशाचे साम्राज्य आहे, तिथे आणखी झगमगाट करण्यात काय अर्थ आहे? मग अंधार नेमका आहे कुठे? किंबहुना अंधार कोठे आहे, याचा विचार करण्याइतकीही वेळ आपल्याकडे राहिलेली नाही किंवा जाणीवपूर्वक त्याचा विचार आपल्याला करायचा नाही. ही वस्तुस्थिती आहे. सरकारला मग ते सरकार केंद्रातले असो किंवा राज्यातले त्यांना अशा उपेक्षितांचे प्रश्न सोडवायचे आहेत हे त्यांनी लक्षात घ्यावे. गेल्या काही वर्षात मोठी अपेक्षा घेऊन सत्तेत आलेल्या केंद्रातील मोदी सरकारच्या स्थापनेनंतरही सर्वसामान्यांच्या जीवनात फारसा काही फरक पडलेला नाही. सुरुवातीला नोटबंदी, त्यानंतर जी.एस.टी. चा बोजा, त्यानंतर कोरोनाचे जागतिक संकट, त्यातून सावरण्यासाठी सरकारची तटपुंजी मदत या सर्व पार्श्वभूमीवर यंदाची दिवाळी फारशी काही उत्साहाची नाही. दिवाळीच्या या प्रकाशात अंधाराची चर्चा कशाला? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. मुंबईसारख्या महानगरात तर सतत आकाशदिव्यांचा झगमगाट असतो, पण दिवाळीच्या दिवसांत सर्वत्र आकाशदिव्यांच्या रांगा उजळल्या असतानाच लालबत्तीच्या भेसूर प्रकाशाआड ओथंबलेल्या अश्रूंचा ओलावा कधी कोणाला जाणवतो? जव्हार मोखाड्याच्या पाड्यांवर कुपोषणाचे संकट कायम असते. तिथल्या निष्पाप जीवांना प्रकाशाचा खरा अर्थ सांगण्याची हीच वेळ आहे, असे आपल्याला कधीच कसे वाटत नाही? राजाला रोजच दिवाळी असते आणि दीनदुबळ्यांसाठी रोजच शिमगा असतो. त्यांच्या वाट्याला वर्षातून किमान एक दिवस प्रकाशाचा किरण पसरावा यासाठी आपल्या संवेदना कधीच कशा हेलावत नाहीत? एका टोकाला चंगळवादाचा कळस गाठला जात आहे, दुसरीकडे याकडे अचंबित आणि हतबलपणे पाहणारे गरीब, अश्राप जीव दिसत असतात. शेजारच्या अंधाराचे भान आपल्याला नसते. या दीपावलीत लक्ष दिव्यांच्या ज्योतीचे तेज उधळीत दीपावलीचे आगमन व्हावे आणि सृष्टीलाच चैतन्याचे स्वप्न पडावे, अवघ्या भूतलावर आनंदाच्या रंगाचीच बरसात व्हावी, त्याप्रमाणे मनामनाचे कोपरे या आनंदसरींनी न्हाऊन निघावे, असे आपल्याला वाटत असले तरीही प्रत्येकाकडे हे वातावरण नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. दैनंदिन व्यापांचा क्षणभर विसर पडून मांगल्याच्या पदकमलांनी अंत:करण निर्मल व्हावे. कोणा दु:खितांच्या काळजावर या आनंदाची फुंकर मारावी. दुभंगलेली मने सांधण्यासाठी दिवाळीच्या महाउत्सवाचे सुंदर निमित्त व्हावे. दिवाळी वर्षातील तीनशे पासष्ट दिवस सुख-दु:खाच्या पाठशिवणीचा आणि थंडी, वारा, ऊन, पाऊस, प्रतिकूलता या सगळ्याचा सामना केल्यानंतरच येते कारण दिवाळी प्रत्येकाचा मनातील आशादीप चिरकाल प्रकाशमान करण्यासाठी येते. अशा प्रकारे एकीकडे अंधार असताना या जगात काही प्रकाशमान बाबीही घडत असतात. त्याच बाबी उराशी बाळगून आपण हा प्रकाशाचा उत्सव साजरा करु या. ■

घराणेशाहीची चर्चा म्हणजे प्रश्नांना बगल

घराणेशाहीच्या मुद्द्याला जोवर वर्ग विश्लेषणाची जोड मिळत नाही, तोवर मात्र जन्माच्या आधारे हे आरोप होत राहणार. जनतेनं हे समजून घेण्याची गरज आहे, की तुमची संसाधनं युवराज वाटतोय का चहावाला हा तुमचा प्रश्नच नाही असू शकत. तुमची संसाधनं तुम्हाला वाटली जात आहेत की नाही, ती तुमच्यापर्यंत पोहोचत आहेत की नाहीत, की त्यांच्यातल्या त्यांच्यात फस्त केली जात आहेत? हा तुमचा खरा प्रश्न आहे. त्यामुळं आपल्या अधिकारांच्या होणाऱ्या चोरीवर लक्ष द्या, तो चोर 'आपल्यातला' आहे का, यावर नाही...कारण त्यांच्यातला कोणीच 'आपला' नाही आणि असूही शकत नाही, हे अंतिम सत्य आहे...

प्रथमेश पाटील

आपण जवळपास २० वर्ष तरी आता घराणेशाही या मुद्द्याभोवती चर्चा ऐकतो आणि करतो आहोत. विशेषतः काँग्रेस आणि स्वातंत्र्योत्तर काळातील इतर प्रस्थापित पक्षांबाबत आपण हे ऐकतो. पण हा आरोप किंवा दृष्टिकोन याच पक्षांविरोधात चिकटवण्यात भाजप आणि संघाला यश कसं आलं आणि येतं याची पुरेशी चिकित्सा यातील कोणी करताना दिसत नाही, हे दुर्दैव.

मुळात सत्ता काय असते, तिचं स्वरूप काय असतं याची चर्चा होणं त्यासाठी गरजेचं असतं. सत्ता म्हणजे सार्वजनिक मालकीच्या संसाधनांचं व्यवस्थापन आणि विल्हेवाट लावणारी यंत्रणा. जनता संसाधनं निर्माण करते आणि ती सांभाळण्यासाठी एक यंत्रणेला नियुक्त करत ती संसाधनं सांभाळण्याची जवाबदारी देते. हा जनता आणि सत्ता यांच्यातला संबंध असतो.

काळाच्या ओघात होतं असं की ही संसाधनं सांभाळणारे आणि संसाधनांचे मूळ मालक यांच्यामध्ये त्यांच्या नियंत्रणावरून संघर्ष सुरु होतो. संभाळणाऱ्यांचे हितसंबंध निर्माण होतात आणि त्या हितसंबंधांच्या जाळ्यातून निर्माण होतो वर्ग. आपल्याच संसाधनाच्या दुर्भिक्षात जगणारा जनतेचा एक वर्ग आणि संसाधनांच्या वाटपात खिरापत लुटणाऱ्यांचा एक वर्ग, हा तो वर्ग संघर्ष असतो.

जेव्हा जनता घराणेशाहीविरोधात चिडत असते, तिच्यामध्ये क्रोध असतो, तेव्हा ती कोणीतरी सत्ताधीशांच्या घरी जन्माला आला म्हणून त्याच्यावर चिडत नसते. तसं असतं तर इंदिरा आणि राजीव वरही लोकांनी प्रेम केलं नसतं.

लोक घराणेशाहीवर तेव्हा चिडतात जेव्हा त्यांच्या वाट्याची संसाधनं नियंत्रित करण्याचे अधिकार त्यांना त्यांच्या हातातून काढून घेतले जाताना दिसतात. म्हणजे लोकशाही जेव्हा जनकेंद्री न राहता ती सत्ताधीशकेंद्री होऊ लागते, तेव्हा जनतेचा तिच्या संसाधनांवर असलेला ताबा कमी होऊ लागतो आणि हा वर्गसंघर्ष निर्माण होतो.

९१ च्या उदारीकरणानंतर ही प्रक्रिया खऱ्या अर्थानं सुरु होते. सरकार, सरकारी यंत्रणा आणि नोकरशाही, यांची दिशाच बदलू लागली. त्यांची दिशा लोककल्याण किंवा लोकाभिमुख निर्णयांच्या उद्देशाचं एक साधन न राहता ती स्वतःच एक उद्देश किंवा सध्या बनून जाते. म्हणजे सरकार एखाद्या कंपनीसारखं वागू लागतं आणि भाषा सरकारच्या नफ्या-तोट्याची केली जाऊ लागते, जनतेच्या नव्हे. कर द्यायचे लोकांनी, कशासाठी, तर रस्ते-पाणी-घर-शाळा यासाठी. पण तो पैसा वळवला जाणार युद्ध, शस्त्रास्त्र, कॉर्पोरेट कर्जमाफी याकडे...मग संसाधनांच्या दुर्भिक्षातून जे जगणं हाती येतं त्यातून जनतेला प्रश्न पडतो, की आम्ही दिलेल्या संपत्तीची विल्हेवाट कोण लावतंय?

याचं उत्तर असायला हवं होतं सत्ताधाऱ्यांच्या हितसंबंधातून निर्माण झाला वर्ग. मात्र भाजप-संघानं व्यापक प्रचार करत काँग्रेस-प्रस्थापित पक्षांना याची जवाबदारी बहाल केली आणि हळूहळू हे हितसंबंधातले दुवे मात्र स्वतःकडे काबीज केले. म्हणजे कॉर्पोरेट-भांडवलदार-कंत्राटदार-सत्ताधारी हा जो नेक्सस आहे, तो त्यांनी ताब्यात घेतला आणि त्या वर्गीय नियंत्रणावरून लक्ष हटवण्यासाठी जो राक्षस तयार केला, तो म्हणजे घराणेशाही.

खरं सांगायचं तर लोकांना काय फरक पडतो त्यांची संपत्ती एखादा 'युवराज' लुटतोय का 'चहावाला'? पण त्यांच्या समजूतीतलं मिथक असं असतं, की युवराज आमच्यातला नाही मात्र चहावाला आमच्यातलाच एक आहे ज्याला संधी मिळाली आहे आमची संपत्ती उपभोगण्याची, हाताळण्याची...त्यांना माहित आहे, की चहावालाही ही संपत्ती हाताळताना त्यांच्याकडे काही तुकडे टाकणार नाहीये, पण चहावाला त्याच्या 'वर्गाचा' प्रतिनिधी वाटत असतो, म्हणून तो त्यांच्यातलाच एक वाटत असतो आणि म्हणून त्यानं त्या संपत्तीवर डल्ला मारणं हे मान्य होतं. पण त्यांच्या दुर्दैवानं त्यांच्या लक्षात येत नाही की ज्या क्षणाला त्या चहावाल्यानं आपला वर्ग बदलला, त्याचक्षणी तो त्यांचा राहिलाच नाही! आणि म्हणूनच त्यांना लाखी कोटी रुपयांची कॉर्पोरेट खिरापत वाटली जाणं याची ना भीती वाटते, ना त्याचा विषाद वाटतो ना त्याला ते भ्रष्टाचार समजतात!

त्यामुळं घराणेशाहीच्या मुद्द्याला जोवर वर्ग विश्लेषणाची जोड मिळत नाही, तोवर मात्र जन्माच्या आधारे हे आरोप होत राहणार. जनतेनं हे समजून घेण्याची गरज आहे, की तुमची संसाधनं युवराज वाटतोय का चहावाला हा तुमचा प्रश्नच नाही असू शकत. तुमची संसाधनं तुम्हाला वाटली जात आहेत की नाही, ती तुमच्यापर्यंत पोहोचत आहेत की नाहीत, की त्यांच्यातल्या त्यांच्यात फस्त केली जात आहेत? हा तुमचा खरा प्रश्न आहे. त्यामुळं आपल्या अधिकारांच्या होणाऱ्या चोरीवर लक्ष द्या, तो चोर 'आपल्यातला' आहे का, यावर नाही...कारण त्यांच्यातला कोणीच 'आपला' नाही आणि असूही शकत नाही, हे अंतिम सत्य आहे...

लेख आवडला असेल तर इंडी जर्नलला आर्थिक मदत करा: bit.ly/SupportIndieJournal ■■

सध्याच्या सायबर क्राइमचा एक भाग म्हणून सेक्स्टॉर्शनकडे (लैंगिक अत्याचार) पाहिलं जात आहे. समाजमाध्यमांद्वारे होणारी ओळख आणि या आभासी मैत्रीतून होणारे अत्याचार ही सध्याची गंभीर समस्या असून यात ४० वर्षांपेक्षा अधिक वयाचे लोक अत्याचाराला बळी पडत असल्याचं तज्ज्ञ सांगतात. मात्र आपली बदनामी टाळण्यासाठी यातले केवळ तीन टक्के प्रकरणांमध्ये न्यायालयात दाद मागितली जाते...

सेक्स्टॉर्शन वाढतेय... का आणि कसे?

स्वाती पेशवे

नोंद

प्रत्येक काळाने गुन्हेगारी प्रवृत्तींचा सामना केला आहे. अर्थातच काळ बदलला की गुन्ह्यांचं स्वरुप बदलतं, यंत्र-तंत्रातले बदल आत्मसात करुन घेत गुन्हेगार फसवणुकीचे वेगवेगळे मार्ग शोधतात आणि 'तो मी नव्हेच' चा चिरतरुण कांगावा करत आपले अपराध लपवण्याचा प्रयत्न करतात. समाजामध्ये अशा प्रवृत्ती कार्यरत आहेत, अनेकजण त्यांच्या जाळ्यात अडकत आहेत, अपराधाची त्यांची ठराविक पद्धत आहे हे माहीत असूनही मी मी म्हणणारे अनेकजण त्यात अडकतात आणि मोठ्या फसवणुकीला बळी पडतात. याच पार्श्वभूमीवर सध्याच्या सायबर क्राइमचा एक भाग म्हणून सेक्स्टॉर्शनकडे (लैंगिक अत्याचार) पाहिलं जात आहे. समाजमाध्यमांद्वारे होणारी ओळख आणि या आभासी मैत्रीतून होणारे अत्याचार ही सध्याची गंभीर समस्या असून यात ४० वर्षांपेक्षा अधिक वयाचे लोक अत्याचाराला बळी पडत असल्याचं तज्ज्ञ सांगतात. मात्र आपली बदनामी टाळण्यासाठी यातील केवळ तीन टक्के प्रकरणांमध्ये न्यायालयात दाद मागितली जाते. यावरुनच या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात येण्यास हरकत नाही. २०२१ मध्ये सेक्स्टॉर्शनच्या ४०९ आणि या वर्षी १४६९ इतक्या तक्रारींची नोंद झाल्याचं पोलिसांकडील नोंदींवरुन समोर येतं. अनेकजण ब्लॅकमेलिंगलाही बळी पडले आहेत.

अलिकडेच क्राइम ब्रांचने सेक्स्टॉर्शनशी संबंधित दोन सहभागींना राजस्थानमधल्या मेवाड क्षेत्रातून ताब्यात घेतलं गेलं आहे. त्यांनी तब्बल दोन लाखांपेक्षा जास्त लोकांना ब्लॅकमेल करुन लाखो रुपये वसूल केले होते. असे लोक सुंदर मुलींच्या फोटोंसोबत खोटं प्रोफाईल तयार करुन सोशल प्लेटफॉर्मवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतात. फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारणं आणि मित्र बनवल्यानंतर त्यांना वॉट्स ॲप नंबर शेअर करतात आणि सेक्स चॅटिंग (सेक्स्टींग) सुरू करतात. त्यानंतर हे सदस्य व्हिडिओ कॉल करतात. यादरम्यान स्क्रीन रेकॉर्डिंग ॲपच्या माध्यमातून व्हिडीओवर नग्न फोटो रेकॉर्ड करतात. अशा प्रकारे नग्न फोटो रेकार्ड केल्यावर किंवा व्हिडियो कॉलवर फक्त चेहरा टिपून मॉर्फ करुन संबंधित व्यक्तीला एखाद्या क्लिपमध्ये किंवा फोटोमध्ये अडकवतात. ते जगजाहीर करण्याची धमक्की देत, ब्लॅकमेल करुन पैशांची मागणी सुरू करतात. हे दुष्टचक्र बराच काळ सुरू राहतं आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे बदनामी टाळण्यासाठी, सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी लोक याविरुद्ध तक्रार करणं टाळू लागतात. त्यामुळेच यांचे हे काळे धंदे राजरोस सुरू राहतात. गेल्या काही वर्षांमध्ये सायबर फ्रॉडवरील काही खास प्रकरणं समोर आली होती. एका आकडेवारीनुसार सर्वात अधिक सायबर गुन्हे उत्तर प्रदेशमध्ये समोर आले आहेत. सेक्स्टॉर्शनच्या बळींमध्ये अनेक लोक कमी वयाचेही आहेत, खेरीज अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असणाऱ्या लोकांमध्येही अनेक अल्पवयीन युवक-युवतींचा समावेश आहे. त्यामुळे ही कीड आपल्या देशातली युवा पिढी नासवत आहे. ही सर्वात घातक बाब म्हणावी लागेल.

फेसबुक सेक्स्टॉर्शन स्कॅम हा कॅटफिशिंग सेक्स्टॉर्शनचा लोकप्रिय उपप्रकार आहे. हे सहसा अज्ञात वापरकर्त्याच्या फ्रेंड रिक्वेस्टनं सुरू होतं. वैकल्पिकरित्या ते मेसेंजरद्वारे थेट संदेश पाठवू शकतात. पीडिताशी चॅटिंग केल्यानंतर कॅटफिशर स्पष्ट प्रतिमा किंवा व्हिडिओची मागणी करतात. तुमच्यासोबत असं घडलं आणि हार मानली तर बहुधा पैशासाठी किंवा अधिक आक्षेपार्ह प्रतिमा मिळवून लुबाडल्याचं आढळेल. गुन्हेगार तुमच्या चित्रांचा आणि व्हिडिओंचा वापर करेल. सुदैवाने, आता फेसबुक घोटाळे आणि झटपट पैसे कमावण्याचे काही प्रयत्न समोर आणणं सोपं झालं आहे. तशी यंत्रणा आता सज्ज आहे. पण तरीही या गुन्ह्यांची संख्या सातत्याने वाढणं ही काळजीची बाब आहे. खंडणीच्या प्रकरणांमध्ये सामान्यत: खूप चांगली दिसणारी व्यक्ती असते. तुम्ही कदाचित त्यांना भेटलाही असू शकता. यामुळे फेसबुक सेक्स्टोर्शनचे धोके कमी लेखून चालणार नाही. या पार्श्वभूमीवर फोटो मॉर्फिंगचा धोकाही लक्षात घेणं गरजेचं आहे. आपला चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर अतिशय बेमालूमपणे जुळवून अश्लील लूक दिला जातो. नंतर हे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन सेक्स्टॉर्शनला सुरुवात होते. सध्या स्नॅपचॅटची क्रेज आहे. विशेषत: शाळा आणि कॉलेजमधल्या विद्यार्थ्यांमध्ये याचं पेव बघायला मिळतं. यात तरुणाई आपले बोल्ड फोटो मेसेजसह एकमेकांना शेअर करते, पाठवते. यातूनही सेक्स्टॉर्शनची सुरूवात होऊ शकते.

हे सगळं पहात असताना सेक्स्टॉर्शन कशामुळे होतं हे पाहणंदेखील गरजेचं आहे. अर्थातच पैसे कमावणं हे यामागील सर्वात मोठं कारण आहे. काही इंटरनॅशनल गँग अधिक आक्रमकपणे केवळ पैसे मिळवण्यासाठी हे काम करतात. यातून अधिकाधिक पैसे कमावणं हेच त्यांचं ध्येय असतं. यासाठी ते नेट फ्रेंडशिपच्या माध्यमातून वेगवेगळ्या देशांमधल्या लोकांना आपल्या जाळ्यात ओढतात. श्रीमंत, खानदानी, विवाहित आदी प्रकारचे स्त्री-पुरुष त्यांचे सोपी शिकार असतात. हे लोक ६०-७० वर्षं वयाच्या लोकांनाही जाळ्यात ओढण्यात यशस्वी होतात. कोणी मजा लुटण्यासाठी तर कोणी बदला घेण्यासाठी वा एखाद्याचं चारित्र्यहनन करण्यासाठीही असे प्रकार करतात. वैयक्तिकरित्या सूड उगवण्यासाठी कोणी हे काम करणाऱ्यांना पैसेदेखील देऊ करतात. अशा प्रकारचा लाभ लक्षात घेऊनही काही लोक या गुन्हेविश्वाकडे वळताना दिसत आहेत. मेसेजच्या माध्यमातून मुलांशी संपर्क साधून, त्यांचे बोल्ड व्हिडिओ, फोटो रेकॉर्ड करून आणि नंतर त्यांच्याशी शारीरिक संबंध निर्माण करुन या जाळ्यात अडकवणारेही अनेक लोक या गुन्हेविश्वात कार्यरत आहेत. भारताबरोबरच यूएस आणि इतर देशांमध्येदेखील अशी अनेक प्रकरणं समोर आली आहेत. काळजीची बाब म्हणजे भारतात अल्पवयीन मुलांशी संबंधित गुन्ह्यांच्या प्रमाणात चिंताजनक वाढ होत आहे.

हे सगळं लक्षात घेता कोणाबाबतही ही परिस्थिती उद्भवली तर घाबरुन न जाता आणि बदनामीच्या काळजीने गुन्हेगारांच्या हातातलं बाहुलं न बनता कायद्याच्या आधारे त्यांना कठोर शासन कसं होईल हे पाहणं गरजेचं आहे. म्हणूनच सर्वप्रथम पोलिसांकडे अशा प्रकरणांची नोंद करणं गरजेचं आहे. सायबर क्राइम सेलमध्ये याची रितसर नोंद करायला हवी. त्याचबरोबर आपल्या कुटुंबातल्या सदस्यांनाही याची माहिती असणं गरजेचं आहे. हे सांगताना संकोच, भीती, लाज आदी भावनांना बळी पडू नये. घरातल्या सदस्यांचा मानसिक, भावनिक आधार तुम्हाला या गुन्हेगारांविरुद्ध लढण्यास बळ देईल. ओळखीचा वापर करून तुम्हाला ब्लॅकमेल करणाऱ्याला ब्लॉक करणं अत्यंत गरजेचं आहे. यात विलंब करु नये. त्याचबरोबर संबंधित ग्रूपच्या ॲडमिनलाही याबाबत सूचना द्या. तुमच्यावर ओढवलेली परिस्थिती त्यांना माहीत असायला हवी. तुम्हाला जाळ्यात अडकवणाऱ्या ज्या प्लॅटफॉर्मविषयी स्पष्ट माहिती द्या आणि काही काळासाठी त्या माध्यमापासून दूर होण्याचा प्रयत्न करा. तुम्ही घाबराल तेवढं हे लोक तुम्हाला घाबरवण्याचा प्रयत्न करतील, हे लक्षात ठेवा. त्यामुळेच न घाबरता परिस्थितीचा सामना करा. ब्लॅकमेल करण्यासाठी गुन्हेगारांनी तुमच्याशी केलेल्या चॅटचा स्क्रीन शॉट काढून ठेवा. ब्लॅकमेलिंगसाठी तुम्ही ऑनलाइन पेमेंट केलं असेल तर या पेमेंटची माहिती पोलिसांना द्या. ब्लॅकमेलरकडून झालेले संवाद फोनवर रेकॉर्ड झाले असल्यास तपास यंत्रणेकडे त्याची माहिती द्या. यामुळे तपास अधिक वेगाने होऊ शकेल. उदाहरणार्थ स्काइप नाव, आईडी, फेसबुक पासवर्ड, वेस्टर्न यूनियन वा मनीग्रामद्वारेपैसे दिले असल्यास स्पष्ट माहिती द्या.



अशा कोणत्याही परिस्थितीत आत्मविश्वास हरवून बसणं योग्य नाही. तपास यंत्रणांकडून विचारल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रश्नाला शांतपणे, सहनशीलतेने आणि प्रामाणिक उत्तरं द्या. ते बोलावतील त्या प्रत्येक वेळी तपासणीसाठी हजर व्हा. शक्यतो फोनवर न बोलता प्रत्यक्ष भेटण्यास प्राधान्य द्या. गुन्हेगारांच्या मागणीवरुन पैसे देणं तात्काळ थांबवा. अर्थातच ही परिस्थिती मानसिक ताण वाढवणारी असते. त्यामुळे गरज पडली तर कौन्सिलर, सायकॅट्रिस्टची मदत घेणंही लाभकारक ठरतं. आता इंटरनेट, सोशल मीडिया आदी आपल्या आयुष्याची अविभाज्य अंगं झाली आहेत. त्यापासून दूर राहणं मनात असलं तरी शक्य नाही. त्यामुळे इथला आपला वावर सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करणं आपल्या हातात आहे. ■■

तिमिरातून तेजाकडे

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि अनिस वार्तापत्राचे संपादक प्राचार्य प.रा.आर्डे यांचे अलिकडेच निधन झाले. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रच्या वार्षिक २०१२ सालच्या अंकात आर्डे सरांची राहुल थोरात आणि आदिती मुळ्ये यांनी घेतली होती. त्या मुलाखतीचा हा पहिला भाग.

तिमीरातून तेजाकडे जाण्याची ओढ हे माणूसपणाचे लक्षण आहे. तिमीर हे अज्ञानाचे प्रतीक. तेजाचा किंवा प्रकाशाचा मार्ग म्हणजे ज्ञानमार्ग. ज्ञानाचा वास्तवाशी असलेला संबंध मुलांना प्रभावीपणे दाखवा आणि ज्ञानाने जग कसे बदलता येते हे त्यांना कळू द्या असे बर्ट्रंड रसेल यांनी 'On education' या ग्रंथात केलेले प्रतिपादन प्रा.आर्डे सरांना अगदी तंतोतंत ज्ञानमार्गावरची वाटचाल करीत आर्डे सर कसे बदलले व शिक्षण क्षेत्रात आणि समाजात परिवर्तनासाठी झपाटून कसे कार्यरत राहिले हे समजून घेणे अंनिवाच्या वाचकांना व कार्यकर्त्यांना खूपच स्फूर्तीदायी ठरेल. एका खेडेगावातील अडाणी मातापित्याच्या पोटी जन्मलेल्या पण ज्ञानमार्गाचा प्रवासी होऊन लोकशिक्षकाची भूमिका पार पाडत अंनिससारख्या सामाजिक चळवळीत भरीव योगदान देणार्या आर्डे सरांची ही मनमोकळी मुलाखत....

प्रश्न : सर, आपली कौटुंबिक पार्श्वभूमी कशी होती? बालपणीचा व शिक्षणाचा प्रवास कठीण होता की, सुखकर?

आर्डे सर : सातारा जिल्ह्यात कोयना धरणापासून २० किलोमीटर पूर्वेला कोयना नदीकाठी चोपडी नावाचं छोटंसं खेडेगाव. आई सांगत असे की, इथे मी गुढीपाडव्याला जन्माला आलो. मग माझी जन्मतारीख मार्चमध्ये यायला हवी. कारण पाडवा मार्चमध्ये येतो. पण माझ्या शाळेच्या दाखल्यावर जन्मतारीख १ जून १९४१ ही आहे. सारांश, खर्या जन्मतारखेची खात्री नाही अशा अडाणी कुटुंबात मी जन्माला आलो. वडील शेतकरी. आई सकाळ-संध्याकाळ चुलीजवळ तर दिवसा शेतात राबायची. दोघेही अडाणी. अख्खा गाव अडाणी. इंग्रजी राजवटीत शाळा नुकत्याच सुरू झाल्या होत्या. पण जुन्या पिढीला शिक्षणाचा गंधही नव्हता.

१९४१ सालचे खेडे कसे असेल? गलिच्छपणा व अनारोग्य याचा सुकाळ होता. दरवर्षी हटकून पटकीची साथ येई. त्यात गावातील २५-३० जण मरत असत. विहीरीला पायर्या त्यामुळे पिण्याचे पाणी अशुद्ध होई. नारूची साथ येई. एकदा प्लेगची साथही आली होती. त्यात काही गावकरी दगावले. अशा वातावरणात मी वाढत होतो. माझ्या आईला आठ मुले झाली. त्यातील पाच अशा साथीतच दगावली. वाचलेल्या तिघा भावात मी वाचलो. वयाच्या ६ व्या वर्षी माझे वडील वारले. लग्नाच्या वरातीत नाचून आल्यावर वडीलांना उलट्या झाल्या व त्यांचा मृत्यू झाला. आई सांगायची, भावबंदापैकी कुणी तरी विष घातले. आता लक्षात येते तो विषप्रयोग नसावा. त्यांना वारंवार पोटात दुखे. ॲसिडीटीचा परिणाम वाढून अल्सर झाला असणार. कारण त्यांना पित्ताच्या उलट्या व्हायच्या असे आई सांगायची.

वडिलांना वारंवार कोर्टकचेरीसाठी तालुक्याला जावे लागे. वकीलांचा रूबाब त्यांना दिसायचा. मरताना ते आईला म्हणाले, 'पोरांना शिकू दे, वकील होऊ दे.'

स्वत: अपार कष्ट झेलून आईने मला शिकविले. पण मी वकील न होता शिक्षक झालो. माझ्या गावातील मी पहिला मॅट्रीक, पहिला पदवीधर, पहिला पोस्ट ग्रॅज्युएट मानाची नोकरी करणारा पहिलाच उच्चशिक्षित. हे कसं घडलं याचा मला खरोखरच अचंबा वाटतो. शिक्षणासाठी प्रतिकूल वातावरण असताना मी शिकलो याचे सारे श्रेय माझ्या आईच्या धैर्याला, कष्टाला व वडिलांचे स्वप्न पुरं करण्याच्या तिच्या निष्ठेला द्यावे लागेल. आईने माझं नाव ठेवलं होतं परशुराम. बिचारीला मी पुढं नास्तिक होणार हे कसं ठाऊक असणार? पूर्वी खेड्यात दोन प्रकारची नावे जास्त प्रिय होती. विष्णू, पांडुरंग, कृष्णा अशी देवाची आणि मुले जगत नसतील तर दगडू किंवा धोंडू अशी असत. नको झालेल्या मुलीचं नाव नकोशी असायचं. प्राध्यापक झाल्यावर कॉलेज सुरू होताना पहिल्या तासाला नव्या वर्गासमोर परिचय देताना मी सांगत असे 'माझं नाव परशुराम.' देव परशुरामाने हातात घेतला परशु (कुऱ्हाड) व तो क्षत्रियांना मारत सुटला. पण मी तसा नाही. माझ्या हातात त्याच्या परशुचा झालाय खडू जो तुम्हाला चांगलं काम करायला शिकवेल.'

माझा बालपणीचा काळ जन्मगावातच गेला. सातवीच्या परीक्षेसाठी गावापासून २५ किलोमीटर अंतरावर कराडला जावे लागले. चौथीपर्यंतचे शिक्षण पाटी पेन्सीलवर चाले. गणिताचा अभ्यास म्हणजे अंकगणित. विज्ञानात रसायन, भौतिक किंवा जीवशास्त्र असा विशेष अभ्यासक्रम नव्हता. शेणाने सारवलेल्या जमिनीवर बसायचे. चुकांना कडक शिक्षा देणारे गुरूजी असत. देसाई नावाचे एक शिक्षक पाढा चुकला तर बेंबीला धरून वर उचलायचे. मरणाची कळ यायची. ओळीने उभे करून पाढे म्हणायचे. पाढा चुकला व खालच्या नंबरच्या मुलाने बरोबर म्हटला तर त्याने चुकलेल्या मुलाचे नाक पकडून थोबाडीत लगवायची व वरच्या नंबराला जायचे. असे होते बालवयातील आमचे शिक्षण. गैरहजर रहाणाऱ्या मुलांना दोन्ही हाताची बोटे एकमेकांत बसवून टांगलेल्या दोरीला अडकवायचे व लोंबकळत ठेवायचे. कित्येक मुलांनी अशा शिक्षेच्या भीतीने शाळा सोडली. पण मी टिकून राहिलो. याला दोन महत्वाची कारणे असावीत. आईचे सतत सांगणे शाळा शीक व अभ्यासात शिक्षेचे प्रसंग माझ्यावर क्वचितच येत.

शाळेच्या वेळी शाळा व इतर दिवशी गाई राखायला डोंगरात जाणे, उन्हाळ्यात नदीत पोहणे, आंब्याच्या झाडावर चढून आंबे आणणे. इतरांच्या संगतीत इतरांच्या परसातील काकड्या पळवणे. अशी १२ वर्षे कशी गेली ते कळलेच नाही. सातवीला प्रथम वर्गात पास झाल्यावर पुढच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. माध्यमिक शिक्षणासाठी ७ किलोमीटर अंतरावर पाटण या तालुक्याच्या गावी जावे लागणार होते. त्यावेळी बसची किंवा कोणत्याही चार चाकी वाहनांची सोय नव्हती. पावसाळ्यात नदीला पूर येई. चार महिने नदी तुडुंब वाहत असे. आईने मामाला विचारले व माझी मामाच्या गावी रवानगी झाली. १ वर्षभर मामांनी आश्रय दिला. पुढे मित्रांच्या सोबत पाटणमध्येच खोली घेऊन राहू लागलो. आठवड्यातून एकदा सात किलोमीटर चालून गावी जायचे; आठवडाभराचे धान्य आई द्यायची. ते घेऊन मित्रांबरोबर स्वयंपाक करायचा. मॅट्रीकपर्यंतची पुढील तीन वर्षे अशी काढली.

प्रतिकूल परिस्थितीशी जुळवून घेण्याची सवय मला लहानपणापासूनच जडली. अडचणींचा बाऊ न करता सोसायचे, झुंजायचे, पुढे जायचे अशी मनोवृत्ती हा माणसाच्या तगून रहाण्याचा गुण माझ्यातही होताच. पावसाळ्यात शाळेला येताना पायवाटेवरची मऊ माती निघून जाई. टोकदार दगड उघडे पडत. अनवाणी पायांना टोचत. जोरदार कळा यायच्या पण शाळेची वेळ गाठायची तर झपझप चालायलाच हवे.

आमच्या शाळेच्या वर्गात जेवणाची पिशवी भिंतीला टांगून ठेवावी लागे. उंदीर कधी कधी फडक्यात बांधलेली भाकरी पळवून नेत. त्यादिवशी दुपारी जेवण नाही. यावर एक उपाय आपोआप मिळाला. त्यावेळी कोयना धरणाचे काम चालू होते तेथून इंजिनियर लोकांची मुले खास गाडीतून आमच्या शाळेला येत. जातेगावकर नावाचा मुलगा का कुणास ठाऊक माझा मित्र झाला. तो आपल्या डब्यातील जेवण मला देई. त्याच्या डब्यातील रोज वेगवेगळ्या रूचकर मेनूची चव अजूनही ओठांवर रेंगाळते. शिक्षणाची आवड हा माझा उपजत गुण असावा. कारण ५ वीपासून मला वाचनाची प्रचंड गोडी लागली. शाळेच्या वाचनालयातील एकही पुस्तक मी वाचायचे शिल्लक ठेवले नाही. मराठी कथा व कादंबऱ्या मी अधाशासारख्या वाचून काढल्या. मात्र शेतकऱ्याचा मुलगा असूनही मला शेतीच्या कामाची आवड वाटली नाही. ते काम कंटाळवाणे वाटे. मामाच्या गावी मित्रांबरोबर खोली घेऊन रहात असताना मला या कामापासून मुक्तता मिळाली व अभ्यासाचे आवडीचे काम मनसोक्त करायला मिळाले. परिणामी कदाचीत निसर्गत: बुध्यांक चांगला असेल म्हणून मी ८ वी पासून प्रत्येक परीक्षेत पहिला येऊ लागलो. मॅट्रीकच्या परीक्षेतही मी शाळेत पहिला आलो. आवर्जून सांगण्याची गोष्ट अशी की बालपणीचा काळ व शिक्षणकाळ जरी कठीण होता, तरी त्याचा बोचरेपणा किंवा यातना मला कडवट बनवू शकली नाही. कारण गरीबी सर्वत्र होती. शाळेतील किंवा इतर सवंगडी कमी जास्त माझ्याच सारखे. काही थोडे अधिक सुखी. त्यामुळे वडीलांच्या मृत्यूनंतर मनमौजी करता आली नाही तरी इतरांचा हेवा वाटला नाही. आईने लाड पुरवले नाहीत, खाण्यापिण्याचे चोचले पुरवले नाहीत पण रोजच्या जेवणाची आबाळही होऊ दिली नाही. मी शिकण्यात आनंदी होतो.

प्रश्न :बरेचविचारवंतप्रचलितशिक्षणपद्धती व्यक्तीमत्व विकासासाठी निरूपयोगी आहेत अशी टीका करतात. आपला अनुभव काय?

आर्डे सर : प्रचलित शिक्षणपद्धती व्यक्तीगत व सामाजिक परिवर्तनासाठी कुचकामी आहे ही टीका मला अर्धसत्य वाटते. माझा जीवनानुभव असे सांगतो की, तुम्ही बदलायचे मनापासून ठरविले असेल तर शिक्षणातून योग्य बदल घडू शकतो. माझ्या शाळेने मला घडविले. 'आडात नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार' अशी एक म्हण आहे. कवी माधव ज्युलियन यांच्या कवितेतील 'वाघिणीचे दूध प्या रे वाघबच्चे फाकडे' अशी ओळ शाळेत पाठ केलेली आठवते. साहित्य, कला, विज्ञान, क्रीडा या क्षेत्रातील विविध उपक्रमांची माझ्या शाळेत रेलचेल होती. मी या सर्व उपक्रमात आघाडीवर असे. त्यातूनच विविध मूल्यांचा संस्कार मी मिळवला व यशवंत-गुणवंत होण्याच्या मार्गावर सफळ झालो. माझ्या व्यक्तीमत्वाची घडण होण्यात माने-देशमुख विद्यालयातील शिक्षकांचा मोठा वाटा आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले व पंडीत नेहरूंच्या मार्गदर्शनाखाली या देशाची नवी घटना डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी यांनी देशाला दिली. त्यातून समाज बदलाचे वारे वाहू लागले. महत्वाचा बदल म्हणजे खेड्यापाड्यापर्यंत सुरू झालेला शिक्षणाचा प्रसार. मी शाळेत जाऊ लागलो तेव्हा या नव्या संधी सुकर झाल्या व ग्रामीण मुलांसाठी विकासाचे पर्व सुरू झाले. यशवंतराव चव्हाणांचे नवे नेतृत्व महाराष्ट्राला लाभले. चव्हाणसाहेब मूळचे कराडचे. त्यांच्या सहकार्याने कराडमध्ये शिवाजी शिक्षण संस्था सुरू झाली. या संस्थेने पाटण या तालुक्याच्या गावी माने-देशमुख विद्यालय ही माध्यमिक शाळा सुरू केली. मी या शाळेचा विद्यार्थी.

शिक्षणतज्ज्ञ शिक्षणाच्या दोन तत्वांचा आवर्जून उल्लेख करतात. Nature आणि Nature . Nurture म्हणजे माणसातील अंत:प्रवृत्ती ज्या जीन्समधून आलेल्या असतात. Nurture म्हणजे बाह्य संस्कार जे विविध माध्यमाद्वारे आपणावर परिणाम करीत असतात. विधायक सर्जनशीलतेची व मूल्यांची आवड माझ्यात आंतरिक प्रेरणेतून आली असावी. शाळेचे वातावरण त्याला पोषक होते. साहजिकच समसमा संयोग झाला व माझे मूल्यांचे भरणपोषण होत गेले.

शाळेत संस्कृत व हिंदी विषय बापट सर शिकवीत. संस्कृत सुभाषितांचा माझ्यावर मोठा परिणाम झाला.

प्रश्न : एखादे सुभाषित सांगा.

आर्डे सर :अति परिचयात अवज्ञा।

संतत गमनात अनादरो भवती
मल्ये भिल्ल पुरंध्री।
चंदन तरू काष्ठम इंधनम कुरूते।

अती परिचयातून अवज्ञा होते. सततच्या पाहुण्याचा अनादर होतो. मलय पर्वतावरील आदिवासी बाई चंदनाचा उपयोग जळणासाठी करते. अशा विविध सुभाषितांचा आशय बापट सर आम्हाला रंगवून सांगत व ती पाठ करून घेत. मला अनुभव असा की, ज्यात गोडी वाटते ते पाठ करावे लागत नाही.

प्रश्न : आणखी काही आठवणी सांगता?

आर्डे सर : आमचे इंग्रजीचे शिक्षक सोनटक्के सर. त्यांना संपूर्ण शब्दकोश मुखोद्गत होता असे त्यांचे सहकारी सांगत. इंग्रजी उच्चाराचे त्यांचे अध्यापन खूपच प्रभावी होते. त्यांच्यामुळे मला इंग्रजी विषयाची गोडी लागली. पुढे महाविद्यालयात इंग्रजी माध्यमातून विज्ञानाचे शिक्षण घेताना मला भाषेची अडचण आली नाही. एवढंच नाही पुढे इंग्रजी साहित्याची मला जी गोडी लागली त्याचे मूळ शालेय शिक्षणात आहे. प्रख्यात तत्वज्ञ रसेल याचे सर्व ग्रंथ मी विकत घेऊन वाचले. एच.जी. वेल्सचे आत्मचरित्र व त्यांच्या विज्ञान कथा मी वाचल्या. अलिकडे अंनिसच्या चळवळीला पोषक असे विवेकवादी विचार मांडणारे God-Delusion (लेखक : रिचर्ड डॉकीन्स) असे ग्रंथ मी वाचू शकलो याचे श्रेय इंग्रजी भाषेच्या माझ्या शालेय अध्ययनाच्या गोडीत आहे.

मराठी विषय आम्हाला सोनटक्के मॅडम शिकवीत. त्यांचा आवाज मधुर होता. त्या मराठी कविता सुंदर चालीने गात. आम्ही मागून म्हणत असू. कवी यशवंताची 'आई' ही कविता, 'मराठी असे आमुची मायबोली' ही माधव ज्युलियन यांची कविता अशा अवीट गोडीच्या कविता त्यांनी आम्हाला शिकविल्या. कोठे तरी जाऊ बसुनी विमानी, अज्ञात ठिकाणी स्वातंत्र्य जिथे, शांती जिथे प्रेम इमानी, तेथे चल राणी या ओळी अजूनही मला स्मरतात. चंद्रविज्ञानावर व्याख्यान देताना त्या माझ्या ओठावर सहज स्फुरतात. ना.सी.फडके यांचा एक लघुनिबंध मला आठवतो. विश्वाच्या भव्यतेचे दर्शन झाल्यावर लेखक भयभीत होतो. स्वप्नातही ही भीती पाठ सोडत नाही. सकाळी हाक ऐकू येते. 'अहो उठा! चहा झालाय!' फडके निबंधाचा शेवट असा करतात, 'चला! जोपर्यंत माझी प्रिय व्यक्ती सहवासात आहे, तिचे हास्य मला प्रसन्न करीत आहे तोपर्यंत या विश्वाच्या पसार्याची व त्यातील आपल्या क्षुद्रतेची काळजी करण्याचे कारण नाही.' धैर्य, शौर्य, नैतिकता यांचे समर्थन करणार्या तसेच विषमता, जातीभेद, स्वार्थ, निर्दयता, शोषण अशा दुर्गुणावर भाष्य करणार्या अशा विविध साहित्याची गोडी शाळेतच लागली व मूल्याधिष्ठीत जीवनाचा माझा मार्ग सुकर झाला.

औपचारिक क्लासरूम शिक्षणाच्या जोडीला शाळेत इतर चांगले उपक्रम चालत. स्नेहसंमेलन हा त्यातील सर्वात चांगला उपक्रम. विविध गुण दर्शनाला त्यात भरपूर वाव असे. संमेलनाअगोदर स्पर्धा होत. त्यात वक्तृत्व, हस्ताक्षर लेखन, निबंध लेखन, पाठांतर अशा विविध स्पर्धा असत. मी या विविध स्पर्धांत हिरीरीने भाग घेऊन बक्षिसे मिळवी. एका संस्कृत व इंग्लिश एकांकीकेतही मी भाग घेतला होता. समोर बसलेल्या मित्रांना व पालकांना माझा अभिनय कितपत भावला कुणास ठाऊक. पण नंतर माझ्या वर्गातले मित्र व मुली यांची कौतुकमिश्रीत नजर सुखावत होती व व्यासपीठासाठीची निर्भयता माझ्यात येत होती हे निश्चित. ते वय प्रेमात पडण्याचे नव्हते. नाहीतर घोटाळा झाला असता.

संमेलनासाठी मुख्याध्यापक दादा वैशंपायन प्रसिद्ध साहित्यिकांना बोलावीत. शाळेच्या चार वर्षांत कवी यशवंत, प्र.न.जोशी, डॉ.वाळींबे असे विचारवंत व साहित्यिक आम्हाला पाहुणे लाभले. त्यांची भाषणे म्हणजे मेजवानीच असायची. पुढे मी एक चांगला वक्ता झालो व महाविद्यालयात नाट्य दिग्दर्शक झालो त्याचा पाया असा शाळेतच घातला गेला. मला असं प्रामाणिकपणे वाटतं की, शालेय किंवा उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमात उच्च मूल्यांचा अंतर्भाव असतोच. घेणार्याला ती मिळतातच. प्रश्न आहे तो ती प्रभावीपणे अध्यापनात आणण्याचा. नेमके इथेच अडते. शिक्षकांना याची जाण नसेल व विद्यार्थ्यांना ती नको असतील तर? आमच्या वेळी शिक्षणाचे मार्केटिंग झालं नव्हतं. ज्यांना हे अधिक माहित करून घ्यावंसं वाटत असेल त्यांनी व्यंकटेश माडगुळकरांची 'झेल्या' ही गोष्ट वाचावी. अध्यापनात प्रेम व जिव्हाळा असेल तर काय घडू शकते हे या कथेत उत्कृष्टपणे अधोरेखीत झालंय. ....

उर्वरित भाग पुढील अंकात

मुलाखतकार - राहुल थोरात,सांगली
९४२२४११८६२
- प्रा. आदिती मुळ्ये,रत्नागिरी

'फ्रोझन रोटी'पासून डिजिटायझेशनपर्यंत

गुजरातमधल्या न्याय प्राधिकरणाने 'फ्रोझन रोटी' प्रकारात मोडणार्या पराठ्यावर १८ टक्के जीएसटी लागू करण्याचा निर्णय योग्य ठरवल्याने अलिकडेच वादाचे तरंग उमटले. याच सुमारास देशात पाच वर्षांमध्ये पहिल्यांदाच अन्नधान्याचा साठा नीचांकी स्तरावर आल्याची माहिती पुढे आली. डिजिटायझेशन भारतीय अर्थव्यवस्थेसाठी गेमचेंजर असल्याचं सिद्ध झाल्याचं वृत्तही अलिकडे भुवया उंचावणारं ठरलं.

महेश देशपांडे

अर्थव्यवस्था किंवा आर्थिक आघाडीवरील घडामोडी म्हणजे सामान्यांच्या आकलनाबाहेरच्या किंवा त्यांच्याशी थेट संबंधित नसलेल्याच बाबी नसतात, तर त्यांच्यावर दुरुन परिणाम करणारे घटक असतात. आर्थिक आघाडीवरचे निर्णय, घडामोडी सर्वसामान्यांच्या रोजच्या आयुष्यालाही स्पर्श करत असतात, फक्त हा संबंध समजून घ्यावा लागतो. तो बारकाईने लक्षात घेतला की रशिया-युक्रेन युध्दामुळे इंधन दरवाढीचा फटका कसा बसला ते कळतं. निर्यातबंदीमुळे देशांतर्गत दरवाढीवर कसं नियंत्रण राहतं, ते उमगतं. आणि पुढे जाऊन रोजच्या किरकोळ आर्थिक घडामोडीही जगण्यावर कसा परिणाम करतात, ते उमगतं. अशाच काही घडामोडींनी आर्थिक आघाडीवरील ताजं चित्र अलिकडेच उलगडून दाखवलं.

देशात वस्तू आणि सेवा कर लागू होऊन आता पाच वर्षे झाली आहेत; पण आजही कोणत्या वस्तूवर जीएसटी असावा किंवा नसावा या मुद्यावर वाद सुरू आहेत. आता रोटी आणि पराठ्यावरुन नवा वाद सुरु झाला आहे. 'फ्रोझन' रोटी-पराठ्यावर जीएसटी लागू करण्याचा निर्णय वादात अडकला आहे. 'रेडी टू कूक'पराठ्यावर जास्त कर मोजावा लागू शकतो. गुजरातमधल्या 'ऑथॉरिटी ऑफ ॲडव्हान्स रुलिंग'या प्राधिकरणाने रेडी टू कूक म्हणजे 'फ्रोझन रोटी'पराठ्यावर १८ टक्के जीएसटी लागू करण्याचा निर्णय योग्य ठरवला. अहमदाबाद इथल्या वाडीलाल इंडस्ट्रीजने कर आकारण्याच्या निर्णयाला प्राधिकरणाकडे आव्हान दिलं होतं. त्यावर प्राधिकरणाने हा निर्णय दिला आहे. त्यामुळे फ्रोझन पराठा खाताना अतिरिक्त कर मोजावा लागणार आहे.

पराठा तयार करणार्या कंपन्यांनी १८ टक्के जीएसटी लागू करण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याचा दावा केला होता. हे पदार्थ गव्हापासून तयार होतात. गव्हाच्या पीठावरही जीएसटी मोजावा लागतो. या दोन्हींवर एक सारखा जीएसटी लागू व्हावा अशी मागणी त्यांनी केली. याचिकाकर्त्याच्या दाव्यानुसार, त्यांची कंपनी आठ प्रकारचे पराठे तयार करते. यामध्ये मलबार पराठा, मिक्स पराठा, व्हेज पराठा, ओनियन पराठा, प्लेन पराठा, लच्छा पराठा यांचा समावेश आहे. गव्हाच्या पिठापासून पराठा तयार करण्यात येतो. त्यामध्ये तेल, भाज्या आणि इतर पदार्थांचा वापर होतो. हा 'रेडी-टू-कूक' प्रकारातील पराठा आहे. तो ग्राहक घरी घेऊन गरम करुन खाऊ शकतो. त्यामुळे त्यावर जीएसटी वा इतर कर लावण्यात येऊ नये, असा युक्तीवाद करण्यात आला होता. गुजरातच्या जीएसटी प्राधिकरणाने रोटी ही 'रेडी टू ईट' प्रकारात मोडते तर हा पराठा 'रेडी टू कूक' प्रकारात मोडत असल्याने या दोन्ही गोष्टी एकदम वेगळ्या असल्याचा दावा केला. प्राधिकरणानेही तूप अथवा बटर लावल्याशिवाय लज्जत येत नसल्याने फ्रोझन पराठा लक्झरी श्रेणीत मोडत असल्याचं स्पष्ट केलं. त्यामुळे पराठ्यावर जीएसटी लावण्याचा निर्णय योग्य ठरवण्यात आला.

याच सुमारास देशात पाच वर्षांमध्ये पहिल्यांदाच अन्नधान्याचा साठा नीचांकी स्तरावर आल्याची माहिती पुढे आली. हा साठा ऐंशी कोटी लोकांना अनुदानाच्या रुपात वापरता येणार होता. हा बंपर अन्नधान्य साठा अचानक कमी झाला. अलिकडेच देशातल्या अनेक भागात पावसाने रौद्र रुप धारण केलं. उशीरा अवतरलेला पाऊस अजूनही

थांबायचं नाव घेत नाही. त्यामुळे शेतकरीच काय, सरकारही हवालदिल झालं आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात बेमोसमी पावसाने हाहाकार उडवला. शेतातली पिकं हातची गेली आहेत. एकूणच शेतीचं प्रचंड नुकसान झालं आहे. गहू आणि तांदळाचं सर्वाधिक नुकसान झालं आहे. त्यानंतर कडधान्य आणि डाळींचं नुकसान झालं आहे. या सर्वांचा परिणाम किरकोळ खाद्यान्न किंमती वाढण्यावर झाला आहे. या किंमती २२ महिन्यांच्या उच्चत्तम पातळीवर आहेत. भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या म्हणण्यानुसार या १ ऑक्टोबर रोजी एकूण अन्नधान्य साठा ५१.१४ दशलक्ष टन होता. त्यात अनिवार्य बफर स्टॉक ३०.७७ दशलक्ष टन या आरक्षित भंडारापेक्षा ६६ टक्के अधिक आहे. सरकार हा साठा या वर्षासाठी राखीव ठेवणार आहे.

सध्याचं तांदळाचं उत्पादन देशाची गरज भागवण्यासाठी पुरेसं आहे; पण खरी चिंता गव्हाच्या साठ्याची आहे. कारण हा साठा गेल्या १४ वर्षांमध्ये सर्वात खालच्या स्तरावर पोहोचला आहे. सरकारने निर्धारीत केलेल्या उद्दिष्टापेक्षा सरकार अर्ध्याच गव्हाची खरेदी करू शकले आहे. मागणी वाढल्याने शेतकरी सरकारऐवजी खासगी व्यापार्यांना गव्हाची विक्री करत आहेत. यंदा कडक उन्हाळ्याच्या झळा जाणवल्याने गव्हाच्या उत्पादनावर त्याचा परिणाम दिसून आला. त्यामुळे गव्हाचे उत्पादन कमालीचे घसरले.तांदळाचा तुटवडा जाणवू नये, यासाठी केंद्र सरकारने यापूर्वी तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के शुल्क लावलं आहे. त्यातून बासमती तांदळाला सवलत देण्यात आली आहे. तरीही खासगी व्यापारी अन्नधान्याचा काळाबाजार करून अथवा साठेबाजी करून जनतेला वेठीस धरण्याची भीती व्यक्त होत आहे.

आता थोडी डिजिटाझेशनच्या मोहिमेची खबरबात. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ पियरे ऑलिव्हर गोरिंचेस यांनी डिजिटायझेशनसाठी भारताच्या प्रयत्नांची प्रशंसा केली आहे. ते म्हणतात की, भारत सरकारचं हे पाऊल हा एक मोठा बदल आहे. डिजिटायझेशन भारतीय अर्थव्यवस्थेसाठी गेमचेंजर असल्याचं सिद्ध झाल्याचं ते म्हणाले. भारताने डिजिटायझेशनच्या क्षेत्रात वेग घेतला आहे. भारताच्या डिजिटायझेशनच्या प्रयत्नांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गोरिंचेस म्हणाले की 'फायनान्शियल इन्क्लुजन'प्रमाणेच डिजिटायझेशन अनेक पैलूंमध्ये उपयुक्त ठरलं आहे. कारण भारतासारख्या देशात बँकिंग व्यवस्थेशी जोडलेले नसलेले लोक मोठ्या संख्येने आहेत. 'आता डिजिटल वॉलेट'मध्ये प्रवेश मिळाल्याने ते सहज व्यवहार करण्यास सक्षम झाले आहेत. डिजिटायझेशनमुळे लोकांच्या अनेक समस्या सोप्या झाल्या आहेत. 'डिजिटल वॉलेट'मुळे लोकांचं जीवन सोपं झालं आहे. कारण 'डिजिटल वॉलेट'मुळेच लोक एकमेकांशी सहज व्यवहार करू शकले आहेत.

'डिजिटायझेशन'मुळे लोकांच्या बँकांशी संबंधित अनेक समस्या सुटल्या आहेत. आता लोकांना बँकेत न जाता घरी बसून माहिती मिळते. यासोबतच शासनाच्या अनेक योजनांचा लाभ नागरिकांना मिळत आहे. डिजिटलायझेशनमुळेच हे शक्य झालं आहे. भारताची वितरण व्यवस्था मजबूत झाली आहे. लोकांना आधुनिक अर्थव्यवस्थेत आणण्यातही ही मोठी मदत आहे. हा वाढीचा घटक आहे आणि 'डिजिटल प्रणाली'मध्ये प्रवेश केल्याने बाजारपेठांमध्येही बदल होतो. भारतासाठी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे डिजिटल उपक्रमामुळे सरकारला लोकांपर्यंत पोहोचणं आणि वितरण प्रणाली लोकांपर्यंत पोहोचवणं शक्य झालं आहे. हे पारंपारिक पद्धतींच्या तुलनेत खूप कठीण होतं. गोरिंचेस म्हणाले की, जग एका संभाव्य मंदीच्या संकटाचा सामना करत असताना भारत एका चमकत्या प्रकाशासारखा उदयाला आला आहे. दहा हजार अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याचं आपलं महत्त्वाकांक्षी लक्ष्य साध्य करण्यासाठी भारताला महत्त्वपूर्ण संरचनात्मक सुधारणा करणं आवश्यक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत अफाट क्षमता आहे; पण आपलं ध्येय साध्य करण्यासाठी भारताला अनेक सुधारणा कराव्या लागतील. भारत सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तिचा वाढीचा वेग सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे. हा एक मजबूत सिग्नल आहे.

कोरोनानंतर आरोग्य विमा काढण्याचं प्रमाण एकीकडे वाढलं असताना वाहनांचा विमा उतरवण्याचं प्रमाण मात्र कमीच आहे. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणा(इर्डा)च्या म्हणण्यानुसार, भारतातल्या रस्त्यावर धावणार्या एकूण वाहनांमधल्या निम्म्या वाहनांचा विमा उतरवलेला नसतो. 'इर्डा'चे अध्यक्ष देबाशीष पांडा यांनी एका कार्यक्रमात ही धक्कादायक माहिती दिली. शिखर परिषदेत सहभागी होणार्या विमा क्षेत्रातल्या व्यक्तींना देशातल्या विम्याच्या बाबतीत ८३ टक्के संरक्षणातलं अंतर भरून काढण्यासाठी काही नावीन्यपूर्ण मार्ग शोधण्याचं आवाहन केलं. गेल्या पाच वर्षांमध्ये विमा उद्योग दर वर्षी ११ टक्के दराने वाढत आहे. अशा परिस्थितीत देशातल्या प्रत्येक नागरिकाला विमा संरक्षण देणं आवश्यक आहे. त्यासाठी लोकांना विम्याचं महत्त्वही उलगडून सांगावं लागेल. विमा क्षेत्रात भारत जगात दहाव्या क्रमांकावर आहे; परंतु वाढ कायम राहिल्यास पुढील दहा वर्षांमध्ये ती सहावी मोठी बाजारपेठ बनू शकते.

डॉक्टरीचा अभ्यास मराठीतून

चिन्मय दामले

मुंबईत ग्राण्ट मेडिकल कॉलेज सुरू झालं, तेव्हा हिंदू आणि पारशी समूदायांनी नाराजी व्यक्त केली. त्यांच्या शुद्धाशुद्धतेच्या कल्पनेत पाश्चात्य वैद्यकीय शिक्षण बसत नव्हतं. सुरुवातीची चारपाच वर्षं प्रतिसाद थंडच होता. नंतर मोजके विद्यार्थी दाखल होऊ लागले. या विद्यार्थ्यांना भाषेचा मोठा अडसर होता. इंग्रजीत शिकवलेलं कळत नसे, स्पेलिंगांच्या चुका होत. त्यामुळे इच्छा असूनही विद्यार्थी वैद्यकीय कॉलेजात पाऊल ठेवायला भीत. जगन्नाथ शंकरशेठांना हे लक्षात आलं. त्यांनी या समस्येवत तोडगा काढायचं ठरवलं. ते तत्कालीन गव्हर्नरांना भेटले आणि विद्यार्थ्यांना मराठीत शिकता येण्याची सोय उपलब्ध करून द्यावी, असा आग्रह धरला. इलाख्यातल्या पहिल्या शिक्षणसंस्था, पहिलं लॉ कॉलेज, डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटी, आणि हे वैद्यकीय महाविद्यालय अशा संस्था सुरू झाल्या होत्या त्या शंकरशेठांमुळे. स्थानिक भाषांमधून प्राथमिक व माध्यमिक शिक्षणास सुरुवात झाली होती तीही त्यांच्यामुळेच. प्रत्येक महत्त्वाच्या सरकारी निर्णयात त्यांचा समावेश असे. त्यांचा आग्रह सरकारनं मोडणं अशक्य होतं.

१८६१ साली वैद्यकीय महाविद्यालयात मराठी भाषेतून शिकण्याची सोय उपलब्ध झाली. सब-असिस्टंट सर्जन डॉ. नारायण दाजी आणि डॉ. भिकाजी अनंत चौबे विद्यार्थ्यांना मराठीत शिकवत असत. इंग्रजीतून शिकवणाऱ्या युरोपीय प्राध्यापकांच्या मदतीस दुभाषे देण्यात आले. हे दुभाषे मराठी भाषक विद्यार्थ्यांना मदत करत. ही सोय आल्यावर पहिल्याच वर्षी दहा मराठी विद्यार्थ्यांनी कॉलेजात प्रवेश घेतला. त्यांना शंकरशेठांनी दर महिना दहा रुपयांची शिष्यवृत्ती देऊ केली. मराठी माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत व्हावी, म्हणून त्यांनी कॉलेजाकडे पाच हजार रुपयांची ठेव सुपूर्त केली. या देणगीच्या व्याजातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणं अपेक्षित होतं. याच्या साधारण दोन वर्षं आधी बंगालात बंगालीतून वैद्यकीय शिक्षण देण्यास प्रारंभ झाला होता. तिथेही विद्यार्थ्यांची संख्या लगेच वाढली. काल देवनागरी लिपीत लिहिलेली, हिंदी भाषेतली क्रियापदे असलेली वैद्यकीय पाठ्यपुस्तकं प्रकाशित झाली, त्यावरून हे आठवलं.

मातृभाषेतून शिक्षण मिळण्याचं बरंच श्रेय जगन्नाथ शंकरशेठांचं आहे. त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनमहाराष्ट्राचा सहा महिने दौरा केला. भाषांची यादी केली, शाळेत जाऊ शकणाऱ्या वयाच्या मुलांच्या याद्या केल्या. डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटीची स्थापना केली. त्यातून स्वभाषेतून पुस्तकं असावीत, शिक्षण मिळावं, हे ठरलं. एलफिन्स्टन साहेब त्यांना अनुकूल असल्यानं हे घडलं.

फेसबुकवरून साभार

विंडिजच्या दुर्दैवाचे दशावतार!

अत्युच्च पदाला गेलेली प्रत्येक गोष्ट तेथे फार काळ टिकून राहात नाही. कधी ना कधी खाली यावेच लागते, हा निसर्गाचा नियम आहे. क्रिकटेही याला अपवाद नाही. क्रिकेटच्या जन्मदात्यांनाच जेथे अत्युच्च पद गाठता आले नाही किंवा तेथे फार काळ राहण्याचे सुख मिळाले नाही, तेथे इतरांची काय कथा. क्लाईव्ह लॉईडच्या वेस्ट इंडिज संघाने क्रिकेटविश्वावर खऱ्या अर्थाने राज्य केले. तब्बल पंधरा वर्षांहून अधिक काळ विंडिज संघाने जागतिक क्रिकेटवर राज्य केले. सार्वभौमत्वाची मोहोर उमटवली. तेच ऐश्वर्य ऑस्ट्रेलियन संघाने शेन वॉर्नच्या कालखंडात आणि त्याआधी तर डॉन ब्रडमन यांच्या कार्यकाळात उपभोगले. धोनीच्या नेतृत्वाखाली भागील संघ त्या शिखरावर काही काळासाठी होता. मात्र, खऱ्या अर्थाने क्रिकेट साम्राज्यावर हुकूमत गाजविली ती विंडिज संघाने. चार-सहा वेगवान गोलंदाजांचा तोफखाना बाळगणाऱ्या विंडिज संघाची दहशत त्या काळात होती. होर्स, लॉईड, रिचर्ड्स यांच्यापर्यंत फलंदाजीचे वर्चस्व अबाधित होते. श्री डेब्ल्युज यांच्या काळातही तेच अनुभवयाला यायचं. त्याच विंडिज संघाचे साम्राज्य पार रसातळाला गेलेले आपण गेल्या दोन दशकांमध्ये पाहिले. मात्र, त्या अपयशातूनही विंडिज संघ स्वतःला सावरायला लागला होता. इंग्लिश कौंटी क्रिकेटची मागणी कमी झाल्यानंतर कॅरेबियन बेटांवर क्रिकेटऐवजी अन्य खेळांकडे युवा पिढी आकर्षित झाली. अमेरिकन फुटबॉल, बास्केटबॉल ॲथेलेटिक्स, बॉक्सिंग या खेळांनी त्यांना भुरळ घातली. अमेरिकेत बेसबॉल, बास्केटबॉल आणि फुटबॉलमध्ये विंडिज बेटांवरच्या खेळाडूंची मागणी वाढायला लागली आणि कॅरेबियन बेटांवरच्या क्रिकेटला घर घर लागली.

Urbane Storey
architecture . interior design . design & build

२००७ च्या ट्वेंन्टी-२० विश्वचषकानंतर भारतासह सर्वच देशांमध्ये टी-२० क्रिकेट लीगचे पेवच फुटले. पुन्हा एकदा जगभरातल्या क्रिकेटमध्ये विंडिज क्रिकेटपटूंसाठीची मागणी यायला लागली. प्रचंड पैसा देणाऱ्या आयपीएल स्पर्धेत नामांकित विंडिज खेळाडू आले. त्याचवेळी विंडिज क्रिकेट संघटनेचा आर्थिक डोलारा कोसळला होता. संघटनाच डबघाईला आली. देशासाठी खेळण्यासाठी मानधन मिळत नव्हतेच, पण एक काळ असा आला, की संघाच्या खेळाडूंना अंगावर घालण्यासाठीच्या गणवेशाचे पैसेही संघटनेकडे नव्हते. भारतातील चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या विंडिज संघाने लाजेखातर दुबईतील राहणे पसंत केले होते. कारण, त्यांच्याकडे भारतातील स्पर्धेसाठी घालावयाचा गणवेश नव्हता. कुणी तरी क्रिकेटप्रेमींनी विंडिज संघाला गणवेश दिला आणि संघ भारतात पोहोचला... नव्हे, चक्क विजेता ठरला. त्यानंतरही विंडिज संघ पुन्हा उभारी घेत राहिला. टी-२० क्रिकटे विश्वचषकातला दोनदा स्पर्धा जिंकणारा संघ हा विंडिजाच होता. मात्र, यंदा असे काही अचानक घडलं. पात्रता फेरीतून मुख्य स्पर्धेत येण्याच्या प्रयत्नात असलेल्या विंडिज संघाला स्कॉटलंड आणि आयर्लंड यांच्याविरूद्धच्या पराभवांनी स्पर्धेतूनच बाहेर केले. खरं तर, यंदाच्या विश्वचषकातील 'डार्क हॉर्स' म्हणून विंडिज संघाकडे पाहिले जात होते.

या अपयशाची कारणे काय?

सर्वप्रथम विंडिज संघाबाबतची अपेक्षा त्यांच्या गत कामगिरीवरून करण्यात येत होती. विद्यमान फॉर्मवरून नाही. त्यामुळे फार दुबळ्या यू.ए.ई. संघाविरुद्ध विजयाव्यतिरिक्त विंडिजला काहीच चांगले करता आले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे, टी-२० क्रिकटेच्या प्रकारकडे आकर्षिक झालेले विंडिज खेळाडू तांत्रिकदृष्ट्या सक्षम नाहीत. त्यांचा क्रिकेटचा तंत्रशुद्ध नाही, बचाव भक्कम नाही. केवळ 'पॉवर हिटिंग'च्या बळावर त्यांना आगेकूच करता येणार नाही, हे यंदा सिद्ध झाले आहे. आयर्लंडच्या खेळाडूंनीदेखील याबाबतीत त्यांच्यावर मात केलेली दिसते. फलंदाजांनी चक्क ४२ चेंडूंत एकही धाव काढली नाही. याचाच अर्थ, विंडिज संघ १३ षटकेच खेळला. केवळ मोठे फटके, चौकार-षटकार विजयी करण्यास पुरेसे नसतात.

ड्वेन ब्राव्हो, पोलार्ड, गेल यांच्यासारखे नामवंत खेळाडू वैयक्तिक स्वार्थासाठी विंडिज संघापासून दूर राहिले, त्यामुळे विंडिजच्या क्रिकेटचे प्रचंड नुकसान झाले. नव्या खेळाडूंपुढे त्यांच्यासमवेत मैदानात खेळण्यासाठी उतरणारे आदर्शच आता उरले नाहीत. मोठ्या खेळाडूंचा स्थानिक क्रिकेटमधील सहभागच या संकटांतून विंडिजला बाहेर काढू शकेल.

आज वादळ होणार की पाऊस?

भारत-पाक महामुकाबला ◀◀ चाहत्यांची उत्सुकता शिगेला

। सिडनी । वृत्तसंस्था ।

टी२० विश्वचषक स्पर्धेत रविवारी भारत आणि पाकिस्तान संघ आमनेसामने येणार आहेत. दरम्यान, या महामुकाबल्यावेळी पावसाची शक्यता मोठ्या प्रमाणात असल्याने दोन्ही देशांच्या क्रिकेट चाहत्यांचा हिरमोड झाला आहे. दरम्यान, मेलबर्न येथे होणाऱ्या या सामन्यात हवामान खात्याने सर्वप्रथम पावसाचा अंदाज वर्तवला होता. परंतु, काही काळाने पाऊस थांबला असून, कडकडीत सूर्यप्रकाश पडला आहे. त्यामुळे सामन्यादिवशी अर्थात उद्याही पावसाची शक्यता खूपच कमी आहे.

सामन्याचे ठिकाण : मेलबर्न, वेळ : दुपारी १.३०

मेलबर्नमध्ये आज म्हणजेच शनिवारी सकाळच्या सुमारास जोरदार पाऊस झाला आणि आकाश ढगाळ झाले होते, त्यामुळे रविवारी भारत-पाकिस्तान सामन्यावेळीही मुसळधार पाऊस पडेल, असं वाटत होतं. पण, मेलबर्नच्या हवामानात अचानक बदल झाला आणि पाऊस थांबून ऊनही पडलं आहे. दरम्यान, Weather.com ने आधी दिलेल्या माहितीनुसार, मेलबर्नमध्ये २३ ऑक्टोबर रोजी पावसाची शक्यता ८० टक्क्यांहून अधिक होती. पण, आता हवामानात बदल झाल्यानंतर तेथे पावसाची २५ टके शक्यता असल्याने सामना वेळेत आणि संपूर्ण ओव्हर्सचा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

सामना रद्द झाल्यास

साखळी सामन्यांसाठी कोणताही राखीव दिवस ठेवण्यात आलेला नाही. त्यामुळे जर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला आणि सामना होऊ शकला नाही तर दोन्ही संघांना २ गुण वाटून दिले जातील.

भारतच वरचढ

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत भारत आणि पाकिस्तानमध्ये एकूण सहा सामने खेळले गेले आहेत. या सहा सामन्यांपैकी पाच सामन्यांमध्ये भारतीय संघ वरचढ ठरला आहे, तर एका सामन्यात पाकिस्तान संघाने विजय मिळविला आहे. २००७, २००७ चा अंतिम सामना, २०१२, २०१४, २०१६ मध्ये भारत विजयी झाला असून, २०२१ विश्वचषकाच्या इतिहासात पाकिस्तान संघाचा भारताविरुद्धचा पहिला विजय आहे.

ऑस्ट्रेलियाचा लाजिरवाणा पराभव

सलामीलाच न्यूझीलंडचा झंझावात

। सिडनी । वृत्तसंस्था ।

टी-२० विश्वचषकाच्या शुभारंभाच्या सामन्यात यजमान ऑस्ट्रेलियाला पारंपरिक प्रतिस्पर्धी न्यूझीलंडने पराभव करीत जोरदार धक्का दिला आहे. पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडने ८९ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

न्यूझीलंडच्या डेव्हॉन कॉनवेने यावेळी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांची सुरुवातीपासूनच धुलाई केली. कॉनवेने यावेळी ५८ चेंडूंत सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ९१ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. यावेळी त्याचे शतक फक्त आठ धावांनी हुकले नाही तर विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात चाहत्यांना शतक पाहण्याचा योग मिळाला असता. कॉनवेला यावेळी सुयोग्य साथ मिळाली ती सलामीवीर फिन ॲलेनची कारण, फिनने यावेळी वादळी फलंदाजी केली. फिनने फक्त १६ चेंडूंत ५ चौकार आणि तीन चौकारांच्या जोरावर ४२ धावा काढल्या. त्यामुळेच

पहिल्या सामन्यात न्यूझीलंडला ऑस्ट्रेलियापुढे २०१ धावांचे आव्हान ठेवता आले होते.

न्यूझीलंडच्या २०१ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाची सुरुवात चांगली झाली नाही. ऑस्ट्रेलियाला एकामागून एक धक्के बसत गेले आणि त्यामुळेच त्यांना सामन्यावर पकड मजबूत करता आली नाही. न्यूझीलंडकडून वेगवान गोलंदाज टीम साऊथी आणि फिरकीपटू मिचेल सँटनर यांनी प्रत्येकी तीन विकेट्स मिळवल्या व ऑस्ट्रेलियाचे कंबरडे मोडले.

खारघरमधील उद्यानांची पुरती दैना

अनेक ठिकाणी तुटलेली खेळणी

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरशहरातीलमैदाने,उद्यानांची तसेच उद्यानातील खेळण्यांची दुरवस्था झाली असून, उद्यानातील तुटलेल्या खेळण्यांवर खेळून इजा करुन घेणार का?, असा प्रश्न बच्चेकंपनीकडून उपस्थित केला जात आहे.

एकविसाव्या शतकातील आधुनिक आणि शैक्षणिक शहर म्हणून खारघर शहराची ओळख आहे. खारघर शहरात 'सिडको'ने सेक्टरनिहाय उद्यान आणि मैदान उपलब्ध करुन दिले आहे. सदर उद्यान सिडकोकडे असताना उद्यान आणि मैदानाची देखभाल केली जात होती. मात्र, पनवेल महापालिका अस्तित्वात आल्यानंतर 'सिडको'ने खारघर शहरातील मैदाने आणि उद्याने महापालिकेकडे हस्तांतरीत केली आहेत. खारघर सेक्टर-२० शिल्प चौक, सेक्टर-२१ मधील उद्यान तसेच इतरही सेक्टरमधील उद्यानात घसरगुंडी, झोपाळा यांसह इतर खेळणी सिडकोकडून उपलब्ध करुन देण्यात आली होती. स्थानिक रहिवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार गेल्या सात-आठ महिन्यांपासून उद्यानातील खेळणी तुटली आहेत. बच्चेकंपनी उद्यानांमध्ये खेळायला जाण्यासाठी एका पायावर तयार असतात. मनसोक्त हुंदडायचे असाच त्यांचा प्लॅन असतो. पण, शहरातील उद्याने खरोखरीच मुलांना खेळण्यायोग्य आहे का, याच्याकडे कुणाचेच लक्ष नाही. आज मुलांना खेळण्यासाठी जागा शिल्लक राहिलेली नाही. उद्यानांच्या दुरवस्थेमुळे तेथे मुलांना घेऊन जाणेही पालकांना नको वाटते. प्रत्येक सोसायटीत मुलांना खेळायला जागा असेलच असे नाही. खेळण्यासाठी जागा नसलेल्या सोसायटीतील मुले रस्त्यावरच खेळत असतात. खारघर शहरातील उद्यानामधील खेळणी तुटलेली असल्याने 'आम्ही खेळायचे कसे', असा सवाल बच्चेकंपनी उपस्थित करीत आहे.

खारघर शिल्प चौक आणि इतर उद्यानातील तुटलेली खेळणी तातडीने दुरुस्ती केली जातील.
– राजेश-कर्डीले, उद्यान अधिकारी, पनवेल महापालिका.

आदिवासींना फराळाचे वाटप

। पाताळगंगा । वार्ताहर ।

रोटरीक्लबऑफपाताळगंगातर्फे वडगाव, वाशिवली व आंबेमाळ आदिवासीवाडी येथे शुक्रवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी जवळपास २०० हून अधिक कुटुंबियांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. आदिवासींच्या घरातदेखील दिवाळी साजरा झाली पाहिजे या सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, फर्स्ट लेडी मित्तल शाह, क्लब सेक्रेटरी डॉ. धीरज जैन, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावळे, श्री. शानबाग, मेघा कोरडे, जयश्री पाटील, वनवासी कल्याण आश्रमच्या सुचेता जोशी व राजश्री कुलकर्णीसहीत पिल्लुलाई कॉलेजचे पाच विद्यार्थीदेखील उपस्थित होते.

विशेष म्हणजे, वडगाव वाडी येथे क्लब सेक्रेटरी डॉ. धीरज जैन यांनी तेथील लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने त्याची तपासणी करून त्यांना औषधेदेखील देण्यात आली.

वृद्धाश्रमात दिवाळी साजरी

। माणगाव । प्रतिनिधी ।

माऊली वृद्धाश्रम बोरवाडी येथे राष्ट्रसेविका समिती अरुंधती शाखेच्या वतीने गुरुवार, २० ऑक्टोबर रोजी दिवाळी साजरी करण्यात आली. यानिमित्त समितीचे सदस्य यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची सौहार्दपूर्ण भेट घेऊन गप्पागोष्टी व कवितांचा कार्यक्रम केला. वृद्धाश्रमातील ९२ वर्षांच्या आजी साधना खाडीलकर यांनी स्वरचित कवितांचे वाचन केले तसेच ज्येष्ठांशी गप्पागोष्टीचा कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्ताने लाडू करंजी, चकली, चिवडा, शंकरपाळे व फळे भेट देण्यात आली. रंगलेल्या गप्पांमध्ये वृद्धाश्रमातील जेष्ठांनी अनुभव कथन केले. दिवाळीनिमित्त फराळ,गप्पागोष्टीची दिवाळी साजरी झाल्याबद्दल ज्येष्ठांनी व समितीच्या सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

आदिवासींची दिवाळी झाली गोड

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासीवाडी विहूर येथे दिवाळी फराळ, खाऊ व कपडे वाटप कार्यक्रम दि. २२ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला होता.

महाविद्यलयातील शिक्षक व शिक्षकतेर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून आदिवासीवाडी लहान मुलांना व तेथील लोकांना दिवाळी फराळ व कपडे वाटप करून त्यांची दिवाळी आनंदात साजरा करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. नितीन पवार, प्रा. समीक्षा माळी, प्रा. अल्ताफ फकीर, जुहेब मोदी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंकसेवक जय खानविलकर, अमोघ मयेकर, अलिया केसरकर, उम्मे कुलसुम हद्दादी, मुब्बशिरा सरगुरू, हलीमा दुराणी, श्रेया बाजी, तन्वी म्हात्रे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

अनाथ बालकांना विविध वस्तूंचे वाटप

। पनवेल । वार्ताहर ।

कोव्हिड-१९ मुळे आई-वडील असे दोन्ही पालक गमावलेल्या चार अनाथ बालकांपैकी अनिकेत बाबू दडस (१७ वर्षे), स्वर्णिम अश्विन काकडे (४ वर्षे) या दोन अनाथ बालकांना जिल्हाधिकारी तथा मिशन वात्सल्य समिती, रायगडचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समिती पनवेल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्र, रोटरी क्लब, हिंदाल्को कंपनी, युवा स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत दिवाळी सणानिमित्त मिठाई, फराळ, शालेय साहित्य आदी वस्तूंचे वाटप तहसील कार्यालयात तहसीलदार तथा पनवेल मिशन वात्सल्य समितीचे अध्यक्ष विजय तळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज कृष्णा पाटील (१५ वर्ष), सलोनी कृष्णा पाटील (१३ वर्षे) ही अनाथ भावंडे तहसील कार्यालयात उपस्थित राहू न शकल्यामुळे मिशन वात्सल्य समिती पनवेल यांनी याची दखल घेत त्यांच्या घरी जाऊन मिठाई, फराळ, शालेय साहित्य आदी वस्तूंचे वाटप केले. याप्रसंगी बाल विकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड, विस्तार अधिकारी वैशाली वैदू, हिंदाल्को कंपनीचे वरिष्ठ अधिकारी लहू रौंधाल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्रचे सचिव अल्लाउद्दीन शेख उपस्थित होते.

अपघातात मोटारसायकलस्वार जखमी

। उरण । वार्ताहर।

जेएनपीए बंदर परिसरातील करळ उड्डाणपुलावरील वळणावरुन जाणाऱ्या एनएमएमटी बसने मोटारसायकला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला आहे. अपघात हा शनिवारी (दि. २२) सकाळच्या सुमारास घडला आहे. मोटारसायकलस्वाराच्या डोक्याला गंभीर स्वरूपाची दुखापत झाल्याने पुढील उपचारासाठी नवी मुंबई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर मोटारसायकलस्वाराची ओळख पटली नसून, उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी वर्गाने त्याचे प्राण वाचविण्यासाठी प्रयत्न केल्याने सर्व स्तरातून पोलिसांवर कौतुकाची थाप पडत आहे.

आली.. आली.. माथेरानची राणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

मे २०१९ मध्ये माथेरान येथून नेरळकडे येत असताना प्रवासी गाडीला अमन लॉजजवळ अपघात झाल्याने नेरळ-माथेरान-नेरळ या नरोगेज मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद झाली होती. त्यानंतर पावसाळ्यात अतिवृष्टीमध्ये या मिनीट्रेनच्या मार्गाची दुरवस्था झाली होती.दरम्यान, आता तब्बल सव्वा तीन वर्षांनी मिनीट्रेन पुन्हा एकदा नरोगेज मार्गावर आली आहे. माथेरानचे पर्यटन आणि दिवाळी सण या पार्श्वभूमीवर मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरू होत असल्याने माथेरानचा पर्यटन हंगाम चांगला जाण्याचे संकेत मिळत आहेत.

नेरळ-माथेरान-नेरळदरम्यान पहिल्या प्रवासी गाडीसाठी सहा प्रवासी डब्बे लावण्यात आले होते. त्यातील द्वितीय श्रेणीचे तीन डब्बे तसेच विस्टा डोम हा १६ प्रवासी क्षमता असलेला वातानुकुलित डब्बा आणि कुपे असे सर्व प्रवासी डब्बे फुल्ल होते. त्यातील द्वितीय श्रेणीमधून ९० तर विस्टा डोममधील १६ प्रवासी यांनी प्रत्येकी ६५० रुपयांची तिकीट खरेदी केली. पहिल्या कुपे फॅमिली डब्यातून पाच प्रवाशांनी १५२५ रुपयांची तिकिटे काढून प्रवास केला. पहिल्या गाडीसाठी एनडीएम ४०३ हे इंजिन लावण्यात आले होते, तर त्या इंजिनाची जबाबदारी के.टी. मतसार आणी सहाय्यक म्हणून मोमीन मुश्ताक आणि गार्ड म्हणून हरीचांद्र आहिरवार यांनी पार पाडली. तिकीट तपासनीस सेल्वा कुमार म्हणून ट्रॅफिक इन्स्पेटर सुबोध कुळकर्णी, ता बुकिंग क्लार्क संतोष जामघरे, रोहिदास लाँगले आणि विनोद मेनन यांनी काम पाहिले. यावेळी नेरळ स्थानक प्रबंधक गुरुनाथ पाटील यांनी पहिल्या गाडीला हिरवा झेंडा दाखवला. त्यावेळी सहायक प्रबंधक मोहित तांडेल, अंकित गुप्ता, वरिष्ठ अभियंता सुशांत सोनवणे, सुरक्षा दलाचे भावेश आदी गडीसोबत नेरळ स्टेशन येथे होते. २० ऑक्टोबर रोजी नेरळ येथून माथेरान अशी चाचणी गाडीची चाचणी यशस्वी झाल्यानंतर मिनी ट्रेनची नेरळ माथेरान नेरळ अशी थेट प्रवासी वाहतूक आज २२ ऑक्टोबरपासून पुन्हा रुळावर आली आहे. तब्बल सव्वा तीन वर्षांनी नेरळ येथून मिनीट्रेन सुरु होत असल्याने नेरळ येथील लोको कार्यशाळेत काम करणारे कर्मचारी आणि अभियंते यांच्यात मोठा उत्साह होता. प्रवासी ट्रेनचा प्रवास पर्यटन हंगाम पूर्ण होईपर्यंत सुखरुप होण्यासाठी इंजिनची पूजाअर्चा करण्यात आली. तर सर्व गाडीला फुलांनी सजविण्यात आले होते. सव्वा तीन वर्षांनी रुळावर आलेल्या मिनी ट्रेनच्या पहिल्या प्रवासी गाडीसाठी एनडीएम ४०३ इंजिन लावण्यात आले होते. तर पहिल्या गाडीचे पहिले तिकीट फिरोज अहमद या पर्यटक प्रवाशाने घेतले.

*** मिनीट्रेनमुळे हिवाळी पर्यटन बहरणार**
*** पर्यटकांसाठी दिवसातून दोन फेऱ्या**

दररोज दहा गाड्या सुरू ठेवा

सध्या प्रवासी आणि पर्यटकांच्या सेवेसाठी नेरळ-माथेरान मार्गावरील अमन लॉज-माथेरान यादरम्यान शटल सेवा सुरू आहे. परंतु ही नेरळ-माथेरान- नेरळ ही मिनिट्रेन सेवा सुरू होताच येथील अमन लॉज ते माथेरान शटल सेवेच्या फेर्या कमी केल्या गेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. किमान शनिवार आणि रविवारी या सुट्टीच्या दिवशी तसेच दिवाळी पर्यटन हंगामात शटल सेवा पूर्ण प्रमाणात दररोज दहा गाड्या चालू राहाव्यात, अशी मागणी माथेरानकर पर्यटन हंगाम लक्षात घेऊन करीत आहे.

भाग्यवान प्रवासी

मुंबई सेंट्रल येथील फिरोज अहमद हे सकाळी साडे सहा वाजता रांगेत उभे होते आणि त्यांनी आपल्या अकरा जणांच्या कुटुंबासह पहिले तिकीट मिळावीत प्रवास सुरू केला.

विस्टा डोममध्ये सिंह यांना तिकीट

६५० रुपये तिकीट असलेल्या नेरळ माथेरान नेरळ मिनीट्रेनमधून प्रवास करण्यासाठी मुंबई येथील अभिषेक सिंह यांनी पहिले तिकीट मिळविले.

सोशल मीडियावर हॅशटॅग nomore प्रॉक्सी वॉर ट्रेंड

वर्षा मेहता
। अलिबाग ।

इथिओपियातील वांशिक पक्षपाताच्या राजकारणाने लोकांना बेड्या ठोकल्या आहेत. हे हानिकारक राजकारण, नवीन इथिओपियाची सुवार्ता सांगणारी, देशाला अस्थिर करणारी, लोकांची एकता ढासळणारी आणि पक्षपाती नसलेल्यांना दुखावत केवळ विशेषाधिकारांचे वितरण करणारी एक धोकादायक सुवार्ता आहे. वांशिक ब्रँडिंग असलेल्या प्रदेशातील लोकांना प्रतिबंधित करणे आणि इथिओपियाच्या भूतकाळातील इतिहासाचे विकृतीकरण करून वांशिक राजकारण एकत्र करणे थांबले पाहिजे आणि इथिओपियासाठी अनुकूल प्रशासकीय संरचना तयार करण्यावर विचार केला पाहिजे. त्यामुळे सोशल मीडियावर nomore प्रॉक्सी वॉर ट्रेंड होत आहे. युनायटेड स्टेट्सचे सचिव अँटोनी ब्लिंकन यांनी ट्विट केले की, अमेरिका या घोषणेचे स्वागत करते. आफ्रिकन युनियन-इथिओपिया सरकार आणि तिग्रेयन प्रादेशिक अधिकारी यांच्यात शांतता प्रक्रिया. आफ्रिकन युनियनचे भागीदार म्हणून, आम्ही उत्तर इथिओपियामध्ये शांतता प्रगत करण्याच्या प्रयत्नांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी वचनबद्ध आहोत. संपूर्ण इथिओपियामध्ये, लोक त्यांच्या लाखोंच्या संख्येने एका आवाजात बोलण्यासाठी आणि मित्र आणि शत्रूंना सारखेच स्पष्टपणे सांगण्यासाठी बाहेर आहेत: इथिओपियाचे लोक त्यांच्या देशाच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेवर कधीही सामील होणार नाहीत.

SOCIAL MEDIA पडसाद

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)